अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.२२ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १४५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# नंदेश्वर येथे तिहेरी हत्याकांड

## एकाच परिवारातील तीन महिलांना एकाचवेळी दगडाने ठेचले

सुराज्य/मंगळवेढा

**दुपारच्यावेळी वस्तीवर कोणी नसल्याचे पाहून एकाच कुटुंबातील तीन महिलांचा एकाचवेळी दगड आणि बेडग्याने ठेचून खून केल्याच्या घटनेने मंगळवेढा तालुका हादरला असून याप्रकरणी मंगळवेढा पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले आहे. मात्र या हत्याकांडामागचे कारण स्पष्ट झाले नसल्यामुळे या प्रकरणातील गूढ वाढले आहे.**







हा प्रकार मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास नंदेश्वर(ता.मंगळवेढा) येथील माळी वस्तीवर घडला असून दीपाली बाळू माळी (वय २०),पारू बाबाजी माळी (वय ५०), संगिता माळी (वय ४५) अशी या घटनेत खून झालेल्या महिलांची नावे आहेत.

दीपाली माळी ही माळी कुटुंबातील सून असून पारू आणि संगिता माळी ह्या दोघी सख्ख्या बहिणी आहेत. याप्रकरणी समाधान महादेव लोहार (वय ३०) यास पोलिसांनी संशयित म्हणून ताब्यात घेतले आहे. नंदेश्वर येथील लोहार मळा येथे बाळू महादेव माळी हे आपल्या कुटुंबीयांसोबत राहतात. मंगळवारी सकाळी बाळू माळी व त्यांची आई जयश्री महादेव माळी हे सांगोला येथे दवाखान्यासाठी गेले होते. दवाखान्याहून दुपारी चार वाजता माघारी आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. बाळू यांची पत्नी दीपाली ही धुणे धूत असताना पाठीमागून आरोपीने डोक्यात दगड घातला असावा अशी प्राथमिक माहिती मिळत आहे. मोठा दगड टाकल्यामुळे दीपाली हिचा चेहरा अक्षरश: चेंदामेंदा झाला होता. दीपालीच्या मृतदेहाशेजारी शेतात वापरले जाणारे बेडगे आणि कुदळ सापडली आहे.

यानंतर घरात असलेल्या पारूबाई बाबुशा माळी, संगिता माळी या बाळू माळी यांच्या दोन आत्या यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर त्यांनाही आरोपीने धावत जाऊन मारले असावे. कारण पारूबाई माळी हिचा मृत्यू मृतदेह घराच्या उजव्या बाजूला पडला होता तर संगिता माळी हिचा मृतदेह घराच्या पाठीमागील बाजूस पडला होता.

**हंबरडा फोडला अन् गर्दी जमली :** हा सर्व प्रकार सांगोल्यातून दवाखाना करून घरी आल्यावर पाहिल्यानंतर बाळू आणि त्यांची आई जयश्री यांनी अक्षरशः हंबरडा फोडला. नंतर घरापासून काही अंतरावर असणाऱ्या शेजाऱ्यांच्या हा प्रकार लक्षात आला. यानंतर ही बातमी नंदेश्वर गावात वाऱ्यासारखी पसरली. बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. ही घटना घडत असताना बाळू माळी यांचा लहान मुलगा घरात झोपला होता. घरासमोरील रडण्याचा आवाज ऐकून जागा झाला. तोपर्यंत त्याची आई दीपाली हिला आरोपीने यमसदनी धाडले होते.

**पोलीस पाटलांनी दिली खबर :** नंदेश्वरचे पोलीस पाटील संजय गरंडे यांनी पोलिसात माहिती दिल्यानंतर तात्काळ अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप, मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने, सांगोला पोलीस ठाण्याचे निरीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे, सत्यजित आवटे, पोलीस उपनिरीक्षक शेटे, पुरुषोत्तम धापटे यांनी घटनास्थळी भेट दिली.

**सापडले रक्ताळलेले कपडे अन् कुऱ्हाड :** माळी कुटुंबीयांच्या घराच्या काही अंतरावर असणाऱ्या समाधान महादेव लोहार याच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यामुळे पोलिसांनी समाधान लोहार यांच्या घराची झडती घेतली असता रक्ताने माखलेले कपडे आणि कुऱ्हाड घरात सापडली आहे. त्यानंतर पोलिसांनी समाधान लोहार यास ताब्यात घेतले असून रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होती.

**माळी हे व्यावसायिक कुटुंब :** माळी कुटुंब हे व्यावसायिक आहे. त्यांचा हॉटेल व कापड व्यवसाय आहे. व्यवसायानिमित्त इतर पुरुष मंडळी दुपारी त्यांच्या दुकानात असताना हा प्रकार घडला आहे. माळी कुटुंब स्वभावाने अत्यंत गरीब असून त्यांच्या बाबतीत हा प्रकार घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे. काही दिवसापूर्वी त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य मयत झाल्याने ते सर्वजण गावातून रानात राहण्यास आले होते.

## महापालिका शहरातील सर्व नळांना मीटर लावणार

### टेंडर प्रक्रिया लवकरच



**सोलापूर :** शहरातील सर्व नळांना मीटर लावण्यात येणार आहेत. त्यासाठी टेंडर प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. यापूर्वी ज्यांनी नळ मीटरसाठी पैसे भरलेले आहेत, त्यांचे पैसे वजा केले जातील आणि उर्वरित रक्कम वसूल करण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

सोलापूर शहरातील अनावश्यक पाणी वापर व पाणी गळती रोखण्यासाठी सर्व नळांना मीटर लावण्यात येणार आहेत. यामुळे आवश्यक तेवढेच पाणी वापरात येऊन पाणीपट्टी ही नियमित वसूल होण्यास मदत होणार आहे. नळ मीटर लावण्याकरिता टेंडर प्रक्रिया लवकरच पार पाडण्यात येणार आहे. सर्व नळांना मीटर लावल्याने पाणी चोरीही रोखण्यास मोठी मदत होईल. यामुळे अनावश्यक पाणीपुरवठा टळला जाईल.

परिणामी मुबलक पाणी उपलब्ध राहणार आहे. सुरळीत पाणीपुरवठा व नियमित पाणीपुरवठासाठी नळ मीटर योजना महत्त्वाची ठरणार आहे, असेही महापालिका आयुक्तांनी सांगितले.

**६.५० कोटी रुपये जमा :** यापूर्वी महापालिका प्रशासनाकडून नळांना मीटर बसविण्यासाठी प्रत्येकी ११०० रुपये प्रमाणे रक्कम जमा करून घेतली होती. नळ मिटर पोटी महापालिकेकडे एकूण ६ कोटी ५० लाख रुपये जमा आहेत. आता लवकरच मिटर लावण्यासाठी टेंडर प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. यामध्ये नळ मीटरची किंमत निश्चित करण्यात येईल. त्यानुसार यापूर्वी ज्यांनी नळ मीटर साठी ११०० रुपये भरले आहेत. ते वजा करून निश्चित किमतीच्या उर्वरित रक्कम मिळकतदाराच्या पाणीपट्टीत जमा करण्यात येईल अथवा वसूल करण्यात येईल, असेही महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी स्पष्ट केले.



## बारावीसाठी तब्बल ५३ हजार २९० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**कॉफी मुक्त इंग्रजी पेपरचा कालचा पहिल दिवस ५४ हजार ३९० विद्यार्थ्यांपैकी ५३ हजार २९० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा**

**सोलापूर :** उच्च माध्यमिक शाळा माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता बारावी फेब्रुवारी मार्च २०२३ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पहिल्याच. दिवशी इंग्रजी विषयाचा कॉफी मुक्त दिवस ठरला .यात जवळपास ५४ हजार ३९० पैकी ५३ हजार २९० विद्यार्थ्यांनी इंग्रजी पेपर दिला. तर ११८० विद्यार्थी गैरहजर राहिले गेल्या अनेक दिवसापासून परीक्षा संदर्भात उलट सुलट चर्चा होत होती परीक्षा कॉफी मुक्त परीक्षा हव्यात अशीच सर्वांची धारणा होती त्यासाठी प्रशासनाने मोठी जय्यत तयारी केली होती आणि प्रत्येक परीक्षा केंद्रावर कॉफी मुक्त परीक्षा व्हावी या दृष्टीने बैठे पथक तैनात करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारे घबराटीचे वातावरण होते.

त्यामुळे काल झालेल्या इंग्रजी विषयाच्या पेपरला दिवसभर कुठलेही केंद्रावर एकही कॉफी बहादर सापडला नाही. त्यामुळे कालचा दिवस हा कॉफी मुक्त दिवस ठरला असल्याचे चर्चा झाली. विशेष बाब म्हणजे दरवर्षी होणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या वेळापत्रकानुसार पहिला पेपर हा मराठी विषयाचा असतो परंतु यावेळेस त्यात बदल करून पहिला पेपर इंग्रजी विषयाचा घेण्यात आला.

त्यामुळे एकंदरीत विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण दिसत होते जिल्ह्यात जवळपास ११ केंद्रातून ही परीक्षा घेण्यात आली इंग्रजी विषयाचा पहिला पेपर हा कॉफी मुक्त ठरला परंतु दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी विद्यार्थ्यांमध्ये जी टक्केवारी असते ती या वर्षी मोठी घट दिसून येणार असल्याचे बोलले जात आहे कारण विद्यार्थ्यांमध्ये कॉपी करत असताना विद्यार्थ्यांवर मोठे कारवाई होणार असल्याने कॉफीकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याची दिसत होते सध्याच्या बारावी परीक्षा पेपर देणारे विद्यार्थी हे २०२० /२१ चे असल्याने त्यावेळी परीक्षा होऊ न शकल्याने त्यांना थेट पास करण्यात आले होते.

## माजी आमदार कदमांना ३ दिवसांची कोठडी

सुराज्य/सोलापूर



अण्णाभाऊ साठे महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष तथा माजी आमदार रमेश कदम यांनी बेकायदेशीरपणे आपल्या पदाचा गैरवापर करून महामंडळाच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात त्यांना २४ फेब्रुवारी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश विशेष न्यायाधीश आर. एन.पांढरे यांनी मंगळवारी दिला.

रमेश कदम यांनी त्यांची आजी बायम्मा गणपत क्षीरसागर (रा.नांदनी ता. बार्शी) यांच्या नावाने दुग्ध व्यवसायाचे कर्ज मंजुरीचे आदेश तयार करून कर्ज मंजूर केले. खोटे प्रकरण खरे भासवून सदरचे आदेश महामंडळाचे कर्मचारी लक्ष्मण कांबळे व इतरांवर दबाव टाकला. आणि ४ लाख ७५ हजाराचा धनादेश देऊन महामंडळ व सरकारची फसवणूक केली. अशा आशयाची फिर्याद अनिल राघोबा मस्के यांनी ३१ मे २०१७ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिली होती. या प्रकरणात पोलिसांनी माजी आमदार रमेश कदम यांना आज न्यायालयासमोर हजर करून ५ दिवस पोलीस कोठडीची मागणी केली होती. आरोपी रमेश कदम यांचेतर्फे सदरची घटना ही २०१४ सालातील असून पोलिसात फिर्याद २०१७ साली दाखल करण्यात आली आहे. आरोपीला पोलिसांनी जवळपास ६ वर्षांनी न्यायालयासमोर हजर केल्याबाबतचा युक्तिवाद मांडण्यात आला.

त्यावर न्यायालयाने कदम यास २४ फेबुवारीपर्यंतची पोलीस कोठडी दिली.या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड मिलिंद थोबडे,ॲड.विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे ॲड.अल्पना कुलकर्णी यांनी काम पाहिले.

## दक्षिण कसब्यात इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



शहरातील दक्षिण कसबा परिसरात राहणाऱ्या एका ४२ वर्षीय अविवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली.

दीपक विश्रामराव कुलकर्णी (वय ४२ रा. दक्षिण कसबा,हुंडेकरी वाडा) असे मयताचे नाव आहे. आज पहाटे २ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत दीपक कुलकर्णी हा अविवाहित असून तो वायरिंगचे काम करीत होता. तो आईसोबत एकटा राहत होता.

या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इथं आपल्याला रोजचं पडलंय !

| कल्याण |
| --- |
| 137-11-579 |

| मेन बाजार |
| --- |
| ---- |

### गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.सावंत आज जिल्हा दौऱ्यावर

## मुख्य आकर्षण मोहोळ ठरणार; राजन पाटलांची भेट घेणार

सुराज्य/सोलापूर

**गोव्याचे मुख्यमंत्री तथा भाजपचे नेते डॉ. प्रमोद सावंत हे बुधवारी २२ रोजी सोलापूर दौऱ्यावर आहेत. त्यांचा जरी सोलापूर दौरा असला तरी या दौऱ्याचे मुख्य आकर्षण मोहोळ आहे. मोहोळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजन पाटील यांच्या अनगर येथील वाड्यावर भेटीसाठी येत असल्याची माहिती आहे. या वाड्यावर काय काय चर्चा होणार याची उत्सुकता वाढली आहे.**



माजी आमदार राजन पाटील यांच्या सातत्याने होत असलेल्या भाजप नेत्यांच्या भेटीमुळे लवकरच राजन पाटील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला पुन्हा जोर आला आहे. मुख्यमंत्री डॉ. सावंत बुधवारी एकतास राजन पाटील यांच्याकडे थांबणार आहेत. त्यामुळे या वेळेत काय चर्चा होणार याची उत्सुकता राजकीय जाणकारासह जिल्ह्यातील मातब्बर नेत्यांना लागली आहे.

माजी आमदार पाटील यांनी १५ दिवसांपूर्वीच अनगर आणि दहा गावे पाणीपुरवठा योजना' व जुना असलेला सीना-भोगावती जोड कालवा' ही दोन कामे कोण करेल, त्याच्या सोबत मी जाणार असल्याचे सांगत त्यांनी वातावरण गरम केले आहे. दरम्यान, यापूर्वी माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व राजन पाटील यांनी साखर कारखान्याच्या कामाचे निमित्त करून दिल्लीला जावून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. पेनूर येथील एका खासगी कार्यक्रमात बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी राजन पाटील यांच्यासारख्या अभ्यासू नेत्याची गरज असल्याने त्यांनी भाजपत यावे, असे थेट आवताण दिले होते. पापरी येथील एका कार्यक्रमात आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मंत्रिपदासाठी आपण वकिली करू, असे विधान खुद्द पाटील यांनी केले होते. त्या वेळीही मोठी खळबळ उडाली होती. राजन पाटील हे सातत्याने भाजप नेत्यांच्या गाठीभेटी घेत आहेत. त्यामुळे आगामी काही काळात ते भाजपचे वाट धरतील अशी चर्चा सुरू आहे.



**राजकारणविरहित पाहुणा या नात्याने आदरातिथ्य करणार : पाटील**

मुख्यमंत्री डॉ. सावंत हे माढ्याला जाणार आहेत. जाता जाता ते आमच्याकडे चहापानासाठी येत आहेत. एवढा मोठा नेता व एका राज्याचा मुख्यमंत्री अनगरमध्ये येत असल्याने राजकारणविरहित पाहुणा या नात्याने त्यांचे आदराथित्य करणे आपले कर्तव्य असल्याचे माजी आमदार पाटील यांनी सांगितले.

# बिहारचे बंड...

महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या सत्तेला सुरूंग लावल्यानंतर केंद्रातील सत्ताधारी भाजपने आता आपला मोर्चा बिहारकडे वळवल्याचे दिसते. मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे अत्यंत विश्वासू असणारे संयुक्त जनता दल संसदीय मंडळाचे प्रमुख उपेंद्र कुशवाह यांनी त्या पक्षातून बाहेर पडून आपला नवीन राष्ट्रीय लोक जनता दल हा पक्ष उभा केला आहे. कुशवाह यांचे हे बंड नितीश यांना जबर धक्का देणारे आहे.आता त्यांचीही खुर्ची राहाते की जाते? अशी चिन्हे दिसत आहेत. कुशवाह यांच्या या भूमिकेने बिहारमध्ये नवे राजकीय समीकरण उदयास येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कुशवाह हे आता स्वतंत्र वाट चोखाळणार की भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक होणार याची देशाला उत्सुकता लागून आहे. अर्थात कुशवाह यांच्यामागे फार मोठी ताकद आहे, अशातील भाग नाही. मात्र, राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील एक प्रमुख नेते अशी ६३ वर्षीय त्यांची ओळख आहे. बिहारमध्ये नितीशकुमारांनी साथ सोडल्याने एकाकी पडलेल्या भाजपचे कुशवाह यांच्या पुढील चालीकडे लक्ष नाही,असे होवू शकेल काय? वास्तविक पाहाता नितीश संयुक्त जनता दलाचे सर्वेसर्वा. कधी लालूप्रसाद यांच्या पक्षाशी तर कधी भाजपशी हात मिळवणी करून त्यांनी गेली अनेक वर्षे आपली सत्ता टिकवली आहे. भाजपसोबत निवडणूक लढवली. कमी जागा मिळूनही भाजपने युतीचा धर्म पाळून नितीश यांना सत्ता



दिली परंतु भाजपच्या वेगळ्या हालचाली दिसताच ते सत्तेतून बाहेर पडले व लालूंचे सुपुत्र तेजस्वी यादव यांना एका रात्रीत गाठले व आपली खुर्ची पुन्हा शाबूत ठेवली.नितीश यांचा हा राजकीय स्वैराचार भाजपला सहन झाला नाही. नितीश यांनी उत्तराधिकारी म्हणून घोषित करावे अशी कुशवाह यांची अपेक्षा होती. त्यांची सुरुवातीला ओळख नितीश यांचे निकटवर्तीय अशीच राहिली. मात्र पुढे दोघांमध्ये कधी मैत्री तर कधी संघर्ष होत राहिला. नितीश यांनी २०२५ ची बिहार विधानसभा निवडणूक राष्ट्रीय जनता दलाचे नेते व उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखाली लढली जाईल अशी घोषणा केली. तेव्हापासून कुशवा संतप्त होते. सातत्याने त्यांनी नितीश यांना लक्ष्य केले. नितीश यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले होते. त्यामुळे जनता दलात फूट अटळ होती. पक्षातील एका गटाचा राष्ट्रीय जनता दलाशी आघाडीला विरोध आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये नितीश यांनी भाजपची साथ सोडून पुन्हा राष्ट्रीय जनता दलाशी संधान बांधले, तेव्हापासून वाद सुरू झाला. त्यातच आता कुशवाह यांनी समर्थकांचे दोनदिवसीय अधिवेशन पाटण्यात बोलावले होते. त्यासाठी जे फलक होते त्यावर जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव यांची छायाचित्रे होती. मात्र नितीश यांचे विश्वासू व जनता दलाचे अध्यक्ष लल्लन सिंह यांची छबी नव्हती. कुशवाह यांनी २००९ नंतर तीन वेळा जनता दलाचा राजीनामा देऊन नवी चूल मांडली. त्यावरून त्यांच्या राजकारणाची कल्पना येते. वैशाली, मुजफ्फरपूर, पाटणा, पूर्व चंपारण, नालंदा व भोजपूर या जिल्ह्यांमध्ये कुशवाह यांचे समर्थक आहेत. शिक्षकी पेशा सोडून ते १९८५ मध्ये राजकीय क्षेत्रात आले. वैशाली जिल्ह्यातील जंदाहा विधानसभा मतदारसंघातून २३ वर्षांपूर्वी ते समता पक्षाचे उमेदवार म्हणून विधानसभेवर विजयी झाले. तर २०१४ मध्ये रोहतस जिल्ह्यातील काराकाट मतदारसंघातून ते लोकसभेवर गेले. केंद्रात मंत्रीही झाले. त्यानंतर ते कधी विधान परिषद तर कधी राज्यसभेवर निवडून गेले. आताही ते विधान परिषद सदस्य आहेत. २०१९ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी सोडल्यावर त्यांनी राजदशी आघाडीतून लोकसभा निवडणूक लढवली. कुशवाह दोन्ही जागांवर पराभूत झाले. पुढे २०२०च्या बिहार विधानसभा निवडणुकीत त्यांनी तिसऱ्या आघाडीशी प्रयोग केला. बहुजन समाज पक्ष तसेच ओवेसी यांचा एमआयएम व उत्तर प्रदेशातील राजभर यांच्या पक्षाला बरोबर घेऊन निवडणूक लढवली. कुशवाह यांनी लढवलेल्या ९९ पैकी एकाही ठिकाणी विजय मिळवता आला नाही तसेच दोन टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली. आघाडीत एमआयएमला पाच जागा मिळाल्या. पुढे २०२१ मध्ये कुशवाह यांनी राष्ट्रीय लोक समता पक्ष संयुक्त जनता दलामध्ये विलीन केला. वादग्रस्त वक्तव्याने ते नेहमी चर्चेत राहिले आहेत. निवडणुकीत आघाडी करण्याबाबत धरसोड वृत्ती राहिल्याचे त्यांच्या आजवरच्या कारकीर्दीवरून दिसून येते.बिहारमध्ये भाजप संधीच्या शोधात आहे.कुशवाह यांचे बंड भाजपच्या पथ्यावर पडणार,असे दिसते.अर्थात यामागे भाजपची फूस नाही,असे म्हणता येणार नाही.नितीश यांना हिसका दाखवण्याची भाजप वाट पहात आहे. तेजस्वी यांनाही तेच हवे आहे.कारण स्वबळावर राष्ट्रीय जनता दलाची सत्ता त्यांना आणायची असून मुख्यमंत्रीपद त्यांनाही खुणावत आहे. नितीश यांच्यामागे जनाधार नाही,हे मागच्या निवडणुकीत स्पष्ट झाले होते.त्यात कुशवाह बाहेर पडल्याने नितीश हे पेचात सापडले आहेत.

वैचारीक

# भावनातरंगी थँक्यू

**आई, संध्याकाळी चक्कर मारायला जाणार आहात का? माझी एकुलती एक सून लीना' मला विचारत होती. हो, जाईन ना! का गं? अहो, ही किराणा सामानाची यादी किराणावाल्याकडे द्यायची होती, जाताना द्याल का? हो देईन की! पण एवढंच आहे ना सामान? मी घेऊन येईन येताना. संध्याकाळी मी सामान आणायच्या निमित्तानं बाहेर चक्कर मारायला निघाले. दुकानदाराकडून सामान घेतलं. थोडीशी जडच झाली पिशवी म्हणून रिक्षावाल्याची वाट बघत थांबले. एका मध्यमवयीन रिक्षावाल्या दादांनी रिक्षा थांबवली व ताई, कुठं जायचंय? असं विचारलं. मी पत्ता सांगून रिक्षात बसले.**

घर येताच रिक्षा थांबली व मी सामानाची जड पिशवी रिक्षातून उतरवू लागले. तेवढ्यात रिक्षावाले दादा माझ्या मदतीला धावले. त्यांनी ती सामानाची जड पिशवी माझ्या घराच्या दाराजवळ आणून ठेवली. मला फार बरे वाटले. मी खूश होऊन त्याला ठरलेल्या पैशांपेक्षा दहा रुपये जास्तच दिले व थँक्यू हं दादा! असं म्हणाले. लगेच तो म्हणाला ताई, उलट मीच तुम्हाला थँक्यू म्हणायला हवं. ताई, थँक्यू म्हणणाऱ्या तुम्हीच पहिल्यांदा मला भेटलात. नाहीतर आमच्यासारख्या रिक्षावाल्यांशी काही लोक विनाकारण हुज्जत घालत बसतात. थँक्यू' तर बाजूलाच राहिलं.

ताई, खरंच आज खूप बरं वाटलं, तुम्ही थँक्यू म्हणालात हे ऐकून! रिक्षावाले दादा एकदम खूश झाले. त्यांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद पाहून मलाही खूप छान वाटले. खरंतर थँक्यू' किती छोटा शब्द पण आभारी आहे' असं म्हणण्यापेक्षा अगदी पटकन तोंडातून निघणारा असा जादुई'च शब्द जणू! हा दोन अक्षरी आशयगर्भी शब्द सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण कळत नकळत कितीतरी वेळा उच्चारत असतो. आपल्या कानावरही पडत असतो आणि बरीचशी कामे अगदी सोपी होऊन जातात. भाजी मंडईत भाजी घेतल्यानंतर भाजीवाली दोन कोथिंबिरीच्या काड्या, कढीपत्ता पण देते, तेव्हा आपण खूश होऊन तिला थँक्यू' म्हणतो, तेव्हा तिचं मिश्कील हास्य खूप काही सांगून जातं. जणू काही ताई, परत या हं! असंच ती सांगत असते. आपणही कोथिंबीर, कढीपत्ता याचे पैसे तिनं घेतले नाही म्हणून खूश असतो. थँक्यू'चा अर्थ कदाचित तिला समजला नसेल, पण ताई आपल्याला छान' म्हणाल्या हे तिच्या डोळ्यातील आनंदातून दिसते. खरंच बिचारी मोठ्या मनाची आहे, अशी आपल्या मनाची समजूत घालून आपण



निघतो तेव्हा तिचं व आपलं नातं मनात घट्ट झालेलं असतं. पुन्हा आपण जेव्हा भाजी घ्यायला जाऊ तेव्हा आपले डोळे नकळत तिचा शोध घेऊ लागतात असा माझा तरी अनुभव आहे. शेजारची छोटी परी धावत धावत माझ्याकडे आली आणि आजी, थँक्यू, थँक्यू, थँक्यू, असं तीन वेळा म्हणत हातात काहीतरी गिफ्ट घेऊन घरभर धावायला लागली. परी, काय आहे बघू हातात? कसला एवढा आनंद झालाय? आजी, तुम्ही शिकविलेला श्लोक मी आज वर्गात मोठ्या आवाजात अगदी न घाबरता पाठ म्हणून दाखवला. आमच्या शाळेत कॉम्पिटिशन होती. हे बघा ना, मला किती मस्त प्राईज मिळालंय! थँक्यू, थँक्यू, थँक्यू, हं आजी! तिचा तो आनंद घरभर आनंदाचा वर्षाव करत होता. तिचा माझ्याबद्दलचा आदर दुणावला होता व थँक्यू' असं ती सारखं म्हणत होती. तिच्या त्या थँक्यू'नं मी पण मनोमन सुखावले. असे हे आनंदाचे क्षण अनेक वेळा आपल्या जीवनात येतात आणि थँक्यू'चे स्वर आळवून जातात.

आभारी आहे' धन्यवाद!' यापेक्षा थँक्यू ' हा शब्द शॉर्ट बट स्वीट' असा आहे. मराठीत आता सध्या अनेक इंग्रजाळलेले शब्द प्रत्येकाच्या तोंडी नियमित येताना दिसतात. थँक्यू' हा शब्द अगदी लहानपणापासून कानावर पडत आहे. त्यामुळे तो जणू काही मराठीच शब्द आहे असं नव्या पिढीला वाटतंय. अगदी एक वर्षाचं बाळ अगदी हट्ट न करता दूध पितं तेव्हा आई त्याला थँक्यू' हं! किती शहाणं बाळ माझं ते, असं म्हणते. तेव्हापासून थँक्यू' हा शब्द कितीतरी वेळा त्याच्या कानावर पडत असतो आणि ते बालकदेखील त्याचा वापर करू लागते.

रखमाला सुट्टी हवी होती. म्हणून ती सांगायला आली. मी तिला सुट्टी तर दिलीच, पण तिला गावाला जायचंय म्हणून दोनशे रुपये जास्तच दिले. तिला खूप आनंद झाला. तो आनंद तिच्या डोळ्यातून ओसंडून वाहत होता. ती आनंदानं मला म्हणत होती, ताई, ठांकू, ठांकू. ताई, तुम्ही लई माझा भार हलका केला, असा बगा तिचं ते ठांकू, ठांकू' ऐकताना मला पण खूप छान वाटत होतं. मी गालातल्या गालात हसत तिचे ते शब्द कानात साठवत होते. अशी ही थँक्यू'ची किमया अजबच आहे. भर उन्हात पाठीवरून सिलिंडर घेऊन जिने चढत चढत येणाऱ्या दादांना प्यायला पाणी दिल्यानंतर त्यांच्या तोंडातून येणारा थँक्यू' हा शब्द तर कृतज्ञतेने ओथंबलेला असाच. किती गहिरा अर्थ भरलेला असतो त्या थँक्यू' या शब्दात. पाणी देणाऱ्याच्या अंतकरणात समाधानाचं चांदणं व पाणी पिणाऱ्याच्या अंतकरणात शांततेची कोजागिरी!

या थँक्यू' शब्दाची देवाण-घेवाण सकाळपासून रात्रीपर्यंत किती वेळा होते ते मोजणं जरा अशक्यच. आनंद, कृतज्ञता, समाधान, शांती, कृतार्थता इ. सकारात्मक भावना समोरच्या व्यक्तीच्या अंतकरणापर्यंत पोहचवण्याचा हा अगदी छोटा थँक्यू ' नावाचा जादूगार जणू प्रत्येकाचा अगदी जवळचा सखाच जणू! या थँक्यू' शब्दाला विविध रंग आहेत. विविध भावनांचे तरंग आहेत. काही वेळा स्पर्शातूनदेखील थँक्यू'च्या भावना एकमेकांच्या अंतकरणापर्यंत पोहचतात. माझ्या मैत्रिणीच्या मिस्टरांची अचानक बायपास सर्जरी करावी लागली. त्यावेळी तिला मी थोडी पैशांची मदत केली. मी तिला भेटायला गेल्यावर तिने मला घट्ट मिठी मारली व थँक्यू'! तू ऐनवेळी देवासारखी धावून आलीस, तो तिचा थँक्यू' माझ्या अंतकरणापर्यंत जाऊन पोहचला. या शब्दातून कितीतरी कृतज्ञतेचे अर्थ मला उमगले. स्पर्शाच्या अबोल भाषेतूनदेखील हा शब्द दुसऱ्या व्यक्तीच्या हृदयापर्यंत जाऊन पोहचतो. कितीतरी मनातल्या गोष्टी सांगणारा हा शब्द! कधी कधी एखादी व्यक्ती घाई गडबडीत किंवा अन्य कारणांमुळे थँक्यू 'म्हणायचं विसरून जाते तेव्हा लगेचच कमाल आहे या बाईची किंवा माणसाची! साधं थँक्यू'सुद्धा म्हणाला/म्हणाली नाही, असे शब्दही कानावर पडत असतात. म्हणजे या थँक्यू'मुळे अपेक्षाभंगाचं शल्यही मनाला टोचायला लागतं. आपल्याला हे सुंदर आयुष्य मिळालंय म्हणून त्या जगन्नियंत्याला थँक्यू' म्हणायलाच हवं नाही का? थँक्यू' या शब्दामुळं एखाद्या व्यक्तीला प्रेरणा पण मिळते व भविष्यातील प्रगती दुप्पट वेगाने होते. आपल्या कामाची कोणीतरी दखल घेतंय, आपल्या कामाचं कौतुक होतंय ही भावना सुखावणारी अशीच असते, नाही का? मग थँक्यू' म्हणायला कशाला विसरायचं? आपली नाती घट्ट करण्यासाठी थँक्यू' म्हणायलाच हवं ना?

**- सविता एरंडे**

टुडेज् ब्लॉग

# परीक्षेला जाता जाता...

परीक्षा म्हटली की अंगात एक प्रकारची धडकी भरते. व्यक्ती कितीही मोठा असला तरी परीक्षा नावाचा तीन अक्षरी शब्द त्याला एखाद्या गिर्यारोहनासारखा कठीण आणि मेहनती वाटतो. व्यक्तीला आयुष्यात अनेक प्रकारच्या परीक्षांना सामोरे जावे लागते त्या परीक्षांचे स्वरूप जरी वेगवेगळे असले तरी त्यातून निर्माण होणारी भीती आणि चिंता जवळपास एकसारखीच असते. आणि परीक्षेत पास झाल्याचा आनंद हा त्या व्यक्तीला जीवनात आपण खूप मोठी मजल मारल्यासारखा वाटतो. आता परीक्षा पण दोन प्रकारच्या असू शकतात ,एक शालेय जीवनात अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा तर दुसरी जीवनातील विविध घटना व त्याचे परिणाम, त्याला सामोरे जाण्याची पद्धती ही पण एक परीक्षाच असते.

ह्यात दुसऱ्या परीक्षेवर परिणाम घालते ती शालेय शैक्षणिक परीक्षा. शालेय परीक्षेत उत्तम मार्गांनी पास झाले असता समोरच्या अभ्यासक्रमात प्रवेश अथवा नोकरीचा मार्ग त्या अधारावरच ठरतो. म्हणून बरेचदा समाजात दहावी व बारावीच्या परीक्षेला जीवनाचा पाया म्हटला जातो अथवा आयुष्याचं टर्निंग पॉइंट म्हटल्या जातं ते याच करिता.

महाराष्ट्र बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेला सुरुवात झाली आहे आणि काही दिवसातच दहावीच्या परीक्षेला देखील सुरुवात होईल. कोरोना काळानंतरची ही महत्वाची परीक्षा कारण कोरोना काळात लेखी परीक्षा ही एकतर आभासी बहुपर्यायी पद्धतीने झाली किंवा प्रत्यक्षात देखील बहुपर्यायी पद्धतीने झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेच्या गतीवर परिणाम पडलेला दिसून येत आहे. परीक्षेच्या काळात जर विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीचा अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल ह्या काळात विद्यार्थी एक प्रकारच्या मानसिक तणावाखाली जगत असतो. त्यामुळे त्याला मानसिक आधाराची व योग्य मार्गदर्शनाची गरज असते. म्हणूनच या कालावधीत पालकांची भूमिका आणि शिक्षकांची भूमिका ही महत्वाची आहे.



पालकांनी आपली भूमिका पार पाडत असताना ती भूमिका सकारात्मक असणे आवश्यक आहे. या काळात आपण आपल्या पाल्यावर एकदम अभ्यासाचं ओझं लादण्याचा प्रयत्नात मानसिकरीत्या त्याला घाबरवून सोडतो घाबरलेल्या परिस्थितीत कोणत्याही प्रकारचे यश हाती येत नाही उलट त्याचा विपरीत परिणाम हा परीक्षेच्या निकालावर पडतो. मग अशा परिस्थितीत पालकांची नेमकी काय भूमिका असली पाहिजे याचा विचार प्रत्येक पालकांनी करणे आवश्यक आहे. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे ती भूमिका सकारात्मकच असावी. म्हणजे विद्यार्थ्यांना कसल्याही प्रकारचं मानसिक दडपण न देता त्याला धीर दिला पाहिजे. या उलट परीक्षेच्या काळात त्यांचं भोजन नियमित होत आहे का? पुरेशी झोप होत आहे का ? या गोष्टींवर लक्ष देणे आवश्यक आहे. बरेचदा पालक त्याच्या अभ्यासाच्याच वेळेवर लक्ष देतात आणि सारखं त्याला अभ्यास कर अभ्यास कर हे पालुपद लावतात. बाकी गोष्टींवर लक्ष देत नाही. परिणामी विद्यार्थी चिंतेच्या ओझ्याखाली जगतो आणि नापास होण्याच्या भितीपोटी अभ्यास केलेले विसरून जातो.


परीक्षेच्या काळात विद्यार्थ्याने देखील फक्त अभ्यासावरच लक्ष न देता दिनचर्या, मोबाईलचा उपयोग, नियामित भोजन, या सारख्या महत्वाच्या गोष्टीवर देखील लक्ष देणे आवश्यक आहे. दिनचर्या ठरवतानी रात्री उशिरा पर्यंत न झोपता सकाळी लवकर उठून अभ्यास करण्याचा आग्रह असला पाहिजे. शिवाय सकाळी नियमितरित्या कमीत- कमी १० मी. मेडीटेशन केला पाहिजे मेडीटेशन केल्याने मन स्थिर होतो व स्मरणशक्ती वाढते व विसरण्याची सवय कमी होते. या काळात शक्यतोवर मोबाईलचा उपयोग कामापुरता करावा. कारण मोबाईलमुळे बराच वेळ हा व्यर्थ निघून जातो आणि ते लक्षात सुद्धा येत नाही. मोबाईल वर रिल्स पाहणाऱ्या व्यक्तींना याचा अनुभव आला असेल. अभ्यास करतांना अभ्यास करण्याची जागा देखील निश्चित केली पाहिजे कारण अभ्यासावर सभोवतालच्या वातावरणाचा देखील महत्वाचा प्रभाव पडतो. जर का आपण घरातच अभ्यास करत असाल तर एकदम बंद खोलीत किंवा टीव्हीच्या ठिकाणी अभ्यास करू नये. खोलीत हवा खेळती असावी शिवाय कोणाच्याही बोलण्याचा व गोंधळाचा त्रास होणार नाही अशी जागा निश्चित करावी. अभ्यास करतांना बाजूचा परिसर म्हणजे एकंदरीत खोली किंवा ठराविक जागा ही स्वच्छ असणे आवश्यक आहे. अस्वच्छतेमुळे अभ्यासात मन लागत नाही याचा अनुभव आपल्या प्रत्येकाला आहे.

परीक्षा केंद्रावर वेळेत पोहचने देखील आवश्यक आहे. किमान परीक्षा सुरू होण्याच्या अर्ध्यातासाआधी पोहचन्याचे प्रयोजन असावे त्या नुसार बाकी गोष्टी ठरविल्या पाहिजे कारण उशीर झाल्यावर व्यक्ती घाबरून जातो आणि अशा अवस्थेत त्याने केलेले नियोजन तो विसरून जातो. त्यामुळे वेळ पाळणे देखील आवश्यक आहे. ह्या सर्व गोष्टींचे पालन केले तर विद्यार्थी योग्य प्रकारे परीक्षेला सामोरे जाईल व त्याला कसल्याही प्रकारचे मानसिक दडपण येणार नाही. दहावी व बारावीची परीक्षा देणाऱ्या सर्व मित्रांना परीक्षेकरिता शुभेच्छा..!

**- दुर्गेश साठवणे, वर्धा**

# सोंग घेतलेल्याला जागे करणे कठीण

आपण मनुष्यजन्माला आलो, ते भगवत्प्राप्तीकरिताच आलो. आतापर्यंत मी पुष्कळ योनी हिंडलो, भगवंताने आता मला मनुष्य योनीत आणले. भगवंता, आता नाही तुला विसरणार' असे कबूल करूनही, आपण जन्माला आलो नाही तर लगेच तू कोण ?' असे म्हणू लागलो ! संत आपल्याला तोच मी' असे भगवंताजवळ कबूल करून आल्याची आठवण करून देतात. पण संतांनी जागे केले तरी आम्ही मात्र पुनः तोंडावरून पांघरूण ओढून घेतो, याला काय करावे ?



झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करणे कठीणच जाते. पुष्कळ तीर्थयात्रा केल्या, पण होतो तसाच राहिलो; यात दोष गंगेचा का माझा? गंगेच्या काठी कितीतरी लोक येतात, स्नान करातात, पूजाअर्चा करतात, मग हे कलियुग आहे असे कसे म्हणावे?' असे एकाने म्हटले. त्यावर दुसरा म्हणला, याचे प्रत्यंतर समोरच दाखवितो. समोर एक रक्तपिती माणूस बसला आहे. त्याला जो पापी नसेल त्याने कवटाळावे म्हणजे त्याची रक्तपिती जाईल. पण एवढे होईल की जर कवटाळणारा माणूस पापी असेल तर त्याला त्या माणसाची रक्तपिती होईल.' असे समजल्यावर जो तो हळूहळू तिथून पसार होऊ लागला! म्हणजे एवढे नेमनिष्ठ, विद्वान, गंगामाईचे रोज स्नान करणारे, तरी आपले अंतः करण शुद्ध झाले आहे असे त्या कुणालाच वाटले नाही!

जनमानस

# भाजपला फायदा होणार किंवा खडतर आव्हान..!

भारतीय निवडणूक आयोगाने नुकतेच शिवसेनेची कमान फुटीर गटाचे नेते राज्याचे मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय दिल्याने साहजिकच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासाठी राजकीय वाटचाल खडतर होणार असे दिसते. १९६६ मध्ये स्थापन झालेली शिवसेना दीर्घकाळ ठाकरे घराण्याशी समानार्थी राहिली. बाळासाहेबांच्या निधनानंतरही उद्धवजींनी संघटनात्मक पातळीवर समजूतदारपणाने पक्ष चालवला, सत्तेवर आले आणि शिवसेनेतून फुटलेल्या गटबाजीच्या राजकीय युद्धालाही समर्थपणे तोंड दिले. तथापि, आता काळाचे चाक ३६० अंशानी फिरले असल्याने उद्धवजींना 'जे झाले, ते झाले' असे समजून यापुढे पक्ष चालवावा लागेल. पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह हिसकावून घेतल्यानंतर उद्धव यांच्यासमोर आव्हाने आणि संकटे उभी आहेत, त्यामुळे त्यांना पक्षाची नव्याने बांधणी करावी लागणार आहे. आता पुन्हा पक्ष फुटण्याचा धोका आहे. यासोबतच पक्षाची कार्यालये ताब्यात घेण्याची लढाईही जमिनी वर लढली जाणार आहे. या सर्व संकटांची आणि अस्तित्वाची लढाई लढत शिवसेना स्वतःला कसे वाचवणार हे पाहावे लागेल. मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीच्या सूचना देऊन कार्यकर्त्यांच्या निष्ठेची चाचपणी करण्याचा प्रयत्न उद्धवजींनी केला असला, तरी ते तितकेसे सोपे असणार नाही. उद्धवजींच्या प्रती जनतेची सहानुभूती आहे, त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे लोकांना वाटते, हे ठीक आहे. पण जनतेला सोबत ठेवण्याचे आव्हान मोठे आहे. त्यासाठी त्यांना कार्यकर्त्यांच्या आणि समर्थकांच्या भावना बाळासाहेबांशी जोडल्या पाहिजेत. कदाचित त्यामुळेच निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर आपल्या




पहिल्या प्रतिक्रियेत शिंदे यांच्यासह त्यांनी थेट पंतप्रधानांवर हल्लाबोल करून या संपूर्ण प्रकरणामध्ये भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा हात असल्याचा आरोप जनतेसमोर केला. यात ते कितपत यशस्वी होतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. या साऱ्या खेळात भाजपला फायदा दिसत आहे कारण मूळ सेना गट कमकुवत झाल्याचा परिणाम महाविकास आघाडीवर नक्कीच होणार आहे. तर दुसरीकडे शिंदे यांच्या गटाचे स्थानिक निवडणुकीतील यश पाहता, त्यांना भाजपची जर योग्य साथ मिळाली तर त्यांना बऱ्यापैकी यश मिळू शकते. तरीही सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केला तर २०२४ मध्ये भाजपा स्वबळावर सत्ता स्थापन करण्याचा जोरदार प्रयत्न करणार, असेच वाटते.

**- प्रा.विजय कोष्टी**

# त्या 'टिप्स'ने कमळ फुलणार?

**कसबा विधानसभा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. आगामी पोटनिवडणूक भाजप शिंदे गटाच्या मदतीने लढविणार आहे. कसबा मतदार संघात पूर्वी खासदार गिरीष बापट यांचे वर्चस्व होते. ते खासदार झाल्यानंतर मुक्ता टिळक या मतदारसंघातून निवडून आल्या. मात्र,गेल्या महिन्यात त्यांचे निधन झाले. या मतदारसंघातून टिळक कुटुंबियांनी उमेदवारी मागितली होती. मात्र, भाजपने मुक्ता टिळक यांचे पुत्र कुणाल टिळक यांना पक्ष प्रवक्तेपदाची संधी दिली. मुक्ता टिळक यांचे पती शैलेश यांच्या बरोबरच, गणेश बीडकर, धीरज घाटे, हेमंत रासने हे इच्छुक होते. त्यापैकी पक्षाने हेमंत रासने यांच्या पारड्यात उमेदवारी दिली.**

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीपासून पुढच्या पाच निवडणुका या मतदारसंघातून जिंकणारे भारतीय जनता पक्षाचे सध्याचे खासदार गिरीश बापट प्रकृती अस्वास्थ्यामुळं निवडणुकीच्या प्रत्यक्ष प्रचारात आतापर्यंत तरी नव्हते. पण आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीची सूत्रं हाती घेतल्यानंतर बापट आणि राज्यसभेचे माजी खासदार संजय काकडे निवडणुकीत सक्रीय झाले आहेत. बापट मतदारसंघात प्रत्यक्ष फिरु शकले नाहीत तरी त्यांचा पूर्वानुभव भाजपच्या निश्चितच कामाला येईल. काही अपवाद वगळले तर या मतदारसंघावर भाजपचेच वर्चस्व राहिले आहे. १९६२, १९६७ आणि १९७२ या तीन निवडणुकांत काँग्रेसनं ही जागा जिंकली होती. आणिबाणीनंतर जनता लाटेत १९७८ मध्ये डॉ. अरविंद लेले या मतदारसंघातून निवडून आले होते. १९८० मध्ये भाजपकडून त्यांनी ही जागा राखली.



८५ मध्ये काँग्रेसचे उल्हास काळोखे इथून निवडून आले. पण १९९० मध्ये पुन्हा अण्णा जोशींनी ही जागा भाजपकडे खेचून आणली. १९९५ नंतर मात्र या मतदारसंघावर भाजपचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. १९९५ पासून पुढच्या पाचही निवडणुका गिरीष बापटांनी जिंकल्या.आता या मतदारसंघात रासने काय कामगिरी करतात याकडं लक्ष लागलं आहे. २०१४ ची निवडणूक सध्याचे काँग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडूनव लढवली होती. काँग्रेसकडून रोहित टिळक रिंगणात होते. त्यावेळी रविंद्र धंगेकर यांना २५ हजार ९९८ मतं पडली होती. तर रोहित टिळक यांना ३१ हजार ३२२. भाजपचे गिरीष बापट ७३ हजार ५९४ मतं मिळवून निवडून आले होते. तर २०१९ च्या निवडणुकीत मुक्ता टिळक यांना ७५ हजार ४९२ मतं मिळाली होती. थोडक्यात आमची मतं पक्की आहेत हे सांगायला भाजपला वाव आहे. २००९ च्या निवडणुकही मनसेकडून लढवेल्या धंगेकरांना ४६ हजार ८२० मतं मिळाली होती.पण त्यावेळी शहरी भागात मनसे प्रमुख राज ठाकरेंची लोकप्रियता होती. त्याचा फायदा धंगेकरांना झाला होता. त्यामुळंच ते एवढी मतं मिळवू शकले होते. पण आता मनसे रिंगणात नाही. मनसे प्रमुख राज ठाकरे आणि भाजपची सध्या वेगळी गणितं सुरु आहेत. राज ठाकरे यांनीही या निवडणुकीत भाजपला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे मनसेची मतं भाजपलाच मिळण्याची निश्चित शक्यता आहे.

त्याचाही वेगळा फायदा भाजपला होऊ शकतो. या निमित्तानं राज्यातील भाजपच्या बड्या नेत्यांची पुण्यातली आवक वाढली आहे. सुमारे ४० नेत्यांची फौज भाजपनं या निवडणुसाठी उतरवली आहे.कसबा कधीच भाजपचा नव्हता असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले मध्यंतरी म्हणाले होते. कसबा मतदारसंघाच्या इतिहासात हा मतदारसंघ पहिल्या निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाकडं होता.चार वेळा काँग्रेसकडं तर नऊ वेळा भाजपकडे हा मतदारसंघ राहिला आहे. त्यामुळं आता पोटनिवडणुकीत हा मतदारसंघ कुणाकडं जातो याकडं राजकीय निरिक्षकांचं लक्ष लागलं आहे.महापालिकेत गेल्या निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या भाजपचं लक्ष आगामी निवडणुकांकडं आहे. फडणवीस पुण्यात होते. रात्री उशीरा त्यांनी गिरीष बापट यांची भेट घेतली. त्यावेळी बापट यांनी त्यांना कसब्याच्या निवडणुकीसाठी काही 'टिप्स' दिल्याची चर्चा कार्यकर्त्यांत आहे.या मतदारसंघात बापट मुरले होते हे नक्कीच. त्यामुळे त्यांच्या या 'टिप्स'मतदानात कशा परिवर्तित होतील, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे. त्यातच बापट यांनी भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. स्वतः फडणवीस हे कुशल राजकारणी आहेत. राज्यात महाविकास आघाडीला बाजूला सारून शिंदे गटाशी भाजपचं सूत जमवून देण्यात फडणवीसांची काय भूमिका होती हे सगळ्यांनीच पाहिलं आहे. आता कसब्याची पोटनिवडणूक स्वतः फडणवीसांनी मनावर घेतली आहे. त्याचाही भाजपच्या मतांवर निश्चित चांगला परिणाम होईल, असं इथले नेते बोलत आहेत. ही निवडणूक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना महाविकास आघाडी म्हणून लढते आहे. मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या एका महिला नेत्यानं इथून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, त्यांच्या दहाव्याचे विधी होण्याअगोदरच अशी इच्छा व्यक्त करणं योग्य नसल्याचं राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कार्यकर्त्यांना आणि इच्छुकांना बजावलं होतं. त्यात धंगेकर यांच्या एका बॅनरवरुन राष्ट्रवादीच्या नेत्यांचे फोटो गायब असल्याचे वृत्त व्हायरल झाले. त्यामुळे आता मविआत वाद असल्याची नवी चर्चा सुरु झाली आहे. याचा फायदा भाजप कसा उठवतो यावरही निवडणुकीची काही गणितं ठरतील. एकूणच पुढचा आठवडा कसबा बातम्यांच्या केंद्रस्थानी राहणार हे निश्चित आहे.

**- अमित गोळवलकर**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## प्रधानमंत्री कौशल्य योजनेंतर्गत जनआधारतर्फे संगणक प्रशिक्षण

**सोलापूर** : आमदार श्रीकांत भारतीय यांच्या वाढदिवसानिमित्त बेरोजगार युवक-युवतींसाठी जनआधार फाऊंडेशनच्या वतीने प्रधानमंत्री कौशल्य योजनेतंर्गत फाऊंडेशनचे संस्थापक आनंद गोसकी यांच्या हस्ते मंगळवारी मोफत संगणक प्रशिक्षण वर्गाचा प्रारंभ करण्यात आला.मानसा टेक्नॉलॉजी येथे प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत सुरू करण्यात आलेल्या मोफत संगणक प्रशिक्षण वर्ग शुभारंभ प्रसंगी आयोजित सोहळ्यात प्रारंभी विद्यार्थ्यांनी 'स्वागतम गीत' सादर करून सोहळ्यासाठी आलेल्या निमंत्रित मान्यवरांचं स्वागत केले. यामध्ये ९० विद्यार्थांनी संगणक प्रशिक्षणास प्रारंभ केला आहे. एका वर्गासाठी ३० विद्यार्थांची एक बॅच आहे. त्यांना तीन महिने मोफत संगणक प्रशिक्षण देण्यात येत असून त्यांच्या कौशल्यानुसार नोकरी उपलब्ध होण्याची संधी असल्याचे प्रतिपादन जनआधार फाऊंडेशनचे संस्थापक आनंद गोसकी यांनी आपल्या उद्घाटनपर मार्गदर्शनात केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमोद नडगिरी होते. रूपा चिलका यांनी कार्यक्रमाचं प्रास्ताविक केले. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून अंबिका वल्लाल हे परिश्रम घेत आहेत. जनआधार फाऊंडेशन व मानसा टेक्नॉलॉजीच्या स्तुत्य उपक्रमाचं यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भरत पाटोळे यांनी केले तर शलविका बोद्याल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.



## एकता मित्रमंडळ संस्थेतर्फे शिवजयंती

**सोलापूर** : एकता मित्रमंडळ बहुदेशीय सामाजिक संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ नेते पुरषोत्तम बरडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी पद्माकर काळे, अध्यक्ष मतीन बागवान ,एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जॉन फुलारे, माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुरुषोत्तम बरडे यांनी एकता मित्र मंडळाच्या कार्याचे तसेच जॉन फुलारे आणि श्रीदेवी फुलारे यांच्या विधायक भूमिकेच कौतूक केले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जॉन फुलारे आणि माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांनी मंडळाच्या माध्यमातून होणाऱ्या सामाजिक कार्याचा उल्लेख आपल्या मनोगतातून केला. यावेळी निर्मला शेळवने, गुणमाला पाटिल, विजया काकडे, मनीषा नलावडे, अश्विनी भोसले, सुनीता गरड, विजया कदम, माधुरी चव्हाण, राधा पवार, सुवर्णा यादव, लक्ष्मी माने, जया रणदिवे , मंडळाचे अध्यक्ष प्रनिल गुळेकर, उपाध्यक्ष अक्षय आनंद, शाहजी गायकवाड, सायबना दिवटे, गणेश पेद्दे, जावेद सय्यद, रोहित गुळेकर, राजू साखरे, भीम दिवटे आदींसह शिवप्रेमीची उपस्थिती होती.

## राष्ट्रवादीच्या प्रदेश सचिवपदी शब्बीर जहागिरदार



**टेंभुर्णी** : महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाच्या प्रदेश सचिव पदी टेंभुर्णी येथील शब्बीर बाबासाहेब जहागीरदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे या निवडीचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष मोहम्मद खान पठाण यांनी दिली आहे. निवडीबद्दल आमदार बबनदादा शिंदे आमदार संजय मामा शिंदे सोलापूर दूध संघाचे अध्यक्ष रंजीत भैया शिंदे आदींनी शब्बीर जागीरदार यांचे अभिनंदन केले. नियुक्तिचे पत्र देतेवेळी माननीय आमदार बबनदादा शिंदे यांचे सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रमेश पाटील, रामभाऊ शिंदे, श्रीकांत लोंढे, शाहजमान जहागिरदार, तनवीर मुलानी, शिराज तांबोळी, सचिन होदाडे उपस्थित होते.

## एटीएस परीक्षेत संस्कृती वाघमारेचे यश



**सोलापूर** : ज्ञानज्योती मराठी विद्यालय येथे दुसरी इयत्तेत शिकणाऱ्या संस्कृती नामदेव वाघमारे हिने नुकत्याच झालेल्या एटीएस परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. या शाळेचे प्राचार्य जनार्दन चव्हाण व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या मुलीने यश संपादन केल्यामुळे या विद्यार्थिनीचे भरभरून कौतुक केले आहे.

## राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमांतर्गत विविध ठिकाणांची आयुक्तांनी केली पाहणी

# २० मार्गांवर होणार वॉटर फाउंटेन, वॉटर कर्टन व सुशोभीकरण

सुराज्य/सोलापूर

**राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमांतर्गत सोलापूर शहराच्या मुख्य प्रवेश द्वार सह विविध २० रस्ते मार्गावरील ठिकाणी वॉटर फाउंटेन , वॉटर कर्टन, इको फ्रेंडली सुशोभीकरण आणि हरित पट्टे तयार करण्यात येणार असून या ठिकाणांची महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी आज दुपारी पाहणी केली. आवश्यकता सूचना केल्या आहेत.**



राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमांतर्गत सोलापूर महापालिकेला प्राप्त झालेल्या एकूण २२ कोटीच्या निधीमधून हवा प्रदूषण कमी करण्यासाठी हरित क्षेत्र वाढविण्याकरिता आर्किटेक्चर असोसिएशनच्या माध्यमातून आयुक्तांच्या आदेशानुसार हा कृती आराखडा शहराच्या आवश्यकतेनुसार तयार करण्यात आला आहे.

नियोजित रस्ते ठिकाणांची पाहणी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी मंगळवारी दुपारी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, सहाय्यक अभियंता तफन डंके, पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलंकर आदी अधिकारी उपस्थित होते.

धुळनियंत्रणाचा एक भाग म्हणून या २० मार्गांवर ठिकाणी ही कामे हाती घेण्यात येणार आहेत. विविध ठिकाणी रस्त्याच्या कोपऱ्यांनी धुळ आढळून येते. त्यामुळेही धुळीचे प्रमाण वाढते. जुना बोरामणी नाका रोड येथील रस्त्याचा वरचा थर खराब झाला आहे. अशाच पद्धतीने शहरातील इतर या निवडक ठिकाणचे रोड वरचा थर खराब झाल्याने धुळींचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. त्याचबरोबर शहरातील काही ठिकाणी डिव्हायडरची दुरावस्था झाली आहे. जड वाहतुकीमुळे ही रस्त्याच्या वरचा थर खराब होऊन धुळींचे प्रमाण वाढते.

जे रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत ते रस्ते गरजेचे आहेत का? कृती आराखड्यानुसार नेमकं काय करण्यात येत आहे. याचींही प्रत्यक्ष पाहणी आयुक्तांनी करत आवश्यक त्या सूचना दिल्या.

### पुतळ्यांच्या ठिकाणी फाउंटेन करण्याचे नियोजन

जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळा, महात्मा बसवेश्वर पुतळा तसेच महात्मा गांधी यांच्या पुतळा परिसरात फाउंटेन (कारंजे) करण्याचे नियोजन आहे. डी मार्ट जवळील जागेत वृक्षारोपण करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. जुना तुळजापूर - नाका बोरामणी नाका, अक्कलकोट रोड - शांती चौक येथे मोठी जागा आहे. या ठिकाणी हरित पट्टा करण्यात येणार असल्याचे आयुक्त उगले यांनी सांगितले.

### खुल्या जागेवर वृक्षारोपण कार्यक्रम

शहरातील काही खुल्या जागेवर वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. २० रस्ते निवडण्यात येत असून जिथे जागा उपलब्ध आहे तिथे हरित पट्टे करण्यात येणार आहेत. रस्ते दुभाजकाची माती खाली पसरू नये यासाठीही आवश्यकता सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक मार्गात हरित पट्टा तयार करण्यात येणार आहे, असेही आयुक्त शितल तेली- उगले यांनी यावेळी सांगितले.

## काव्यधून कार्यक्रमातून महिलांनी सादर केले काव्यवाचन

सुराज्य/सोलापूर




स्त्रियांच्या जीवन प्रवासातील बाल्य, तारुण्य, आणि वार्धक्य या तीन टप्प्यामधील काही स्वरचित तर काही ख्यातनाम कवींच्या वेचक कवितांचा कार्यक्रम सादर केला. निमित्त होते सदाफुली महिला वाचनालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे. रेल्वे स्टेशन जवळील प्रीती केटरर्सच्या हॉल मध्ये 'काव्यधून' कार्यक्रम झाला. शालेय जीवनातील सर्व जुन्या मैत्रिणींनी एकत्रित येऊन त्यांनी काही स्वरचित तर काहींनी नामवंत कवींच्या कविता, काव्य गायनासह, काव्यवाचनाचा कार्यक्रम 'काव्यधून' मधून सादर केला. यासाठी सोलापूरच्या डॉ. मनीषा अंधळगावकर यांनी पुढाकार घेतला होता.

शिल्पा चिटणीस यांनी शैशव, कृष्णमंजिरी, तिचा पाऊस, या स्वरचित कविता सादर केल्या, तर मंजिरी कुलकर्णी यांनी, जीवन गाणे, घुसमट, आणि वय या कविता सादर केल्या. मानसी कुलकर्णी यांनी, समांतर, ओवी, झोका, या कविता सादर केल्या. तर अनघा दातार यांनी शशी पूर्ण पौर्णिमेचा, मूलमंत्र, संध्याकाळ, या आशय पूर्ण कविता सादर करून रसिक महिलांची वाहवा मिळवली. डॉ. क्षमा वळसंगकर यांनी 'फ्लेमिंगो' ही आशयपूर्ण कविता सादर केली.

यानंतर दिवंगत कवियत्री विजया जागीरदार यांची, जा बाई जा..., कवी वसंत बापट यांची लावणी इवलीची.., कवयित्री शांता शेळके यांची आजोळच्या वाटेवर.., इंदिरा संत यांची पत्र लिही पण..., मो. दा. देशमुख यांची ऊन ऊन खिचडी.., गोविंद स्वामी आफळे यांची रखुमाई रुसली.., आणि शशी डंबारे यांची मैत्री... या कविता सर्वांनी सादर केल्या.

या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमासाठी डॉ. सुनील अंधळगावकर, पुणे येथून काव्यप्रेमी महिला मंडळाच्या मानसी मेहेंदळे, प्रज्ञा समुद्र, अपर्णा पारसनीस, संध्या पारंगे, वर्षा भावार्थी, हेमांगी जोशी, आणि अपर्णा वाळवेकर, यांच्यासह सोलापुरातील सीमा किनीकर, उषा शहा, स्मिता वढावकर, विजया झांबरे, डॉ. सुलभा झांबरे, कल्पना करस्तुरे, विद्या झांबरे, सरिता मोकाशी, अंजली नानल, मीना देशपांडे, मृणालिनी पंडित, रेवती टिंगरे, डॉ. ज्योती पाटील, प्रिया सहस्त्रबुध्दे, आराधना म्हस्कर, पुष्पा कुलकर्णी, चित्रा बेडेकर, तृप्ती बापट, कांचन दबडे, वैजू शेट्ये, मंजू आपटे, अनुजा सुर्डी, जयश्री पटवर्धन यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मजरेवाडी स्मशानभूमीची सुधारणा करण्याची मागणी

**सोलापूर** : शहर हद्दवाढ भागातील श्री सिध्देश्वर साखर कारखानालगत मजरेवाडी हिंदू व लिंगायत स्मशानभूमींची दूरवस्था झाली आहे. गेल्या १० वर्षांपासून सदरच्या ठिकाणी कोणतेही विकास कामे केले नसल्यामुळे खालील सर्व विकास कामे होणे अत्यंत गरजेचे आहे. लवकरात लवकर स्मशानभूमींची सुधारणा करण्याची मागणी परिवहनचे माजी सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी पालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

होटगी रोडस्मशानभूमी पर्यंत नव्याने रस्ता डांबरीकरण करावे, वेटींगशेड बांधण्यात यावे. वॉल कंपाऊंड, पार्किंगची सु सुधारणा करावी, पाण्याची नविन पाईप लाईन टाकून पाण्याची व्यवस्था करावी, हिंदू स्मशानभूमीसाठी एकच दहन शेड असून या ठिकाणी विद्युतदाहिनी बसवून मिळावी, या ठिकाणी रूम उपलब्ध आहे, कैलासरथ (शववाहिका) ची सोय करण्यात यावी यासह विविध मागण्या हत्तुरे यांनी केल्या आहेत.

### स्मशानभूमीतील समस्या दूर करू : आयुक्त

हत्तुरे यांच्या मागणीची दखल घेत आयुक्त शितल तेली-उगले यांनी सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाला सर्व्हे करण्याचे आदेश दिले त्या अनुषंगाने ज्युनिअर इंजिनिअर परशुराम बोमकट्टी व चेतन भोसले यांनी हत्तुरे यांच्या समवेत स्मशानभूमी विकास कामासंदर्भात पाहणी केली. लवकरच या स्मशानभूमीतील समस्या दूर करू, असे आयुक्तांनी सांगितले.

## वेळापूर येथे इलेक्ट्रिक वजन काटे तपासणी

सुराज्य/वेळापूर

> प्रत्येक दुकानदाराकडे वजन काट्याच्या क्षमतेच्या एक दशांश पर वजने ठेवणे व प्रत्येक वर्षी वजनांची पडताळणी करून घेणे बंधनकारक आहे.
>
> **-अ.ध.गेरमे उपनियंत्रक वैधमापन शास्त्र सोलापूर जिल्हा**

वेळापूर तालुका माळशिरस येथे अ.ध. गेरमे उपनियंत्रक वैधमापन शास्त्र सोलापूर जिल्हा व ए वाय इंगोले निरीक्षक वैधमापन शास्त्र अकलूज यांच्यावतीने वेळापूर मधील इलेक्ट्रिक वजन काट्यांची तपासणी करण्यात आली.

स्वाभिमानी शेतकरी संघटना युवा आघाडी तालुकाध्यक्ष अजित कोडक यांनी वैध मापन शास्त्र विभाग अकलूज यांच्याकडे अजित कोडक व दीपक सावंत यांनी तीन ते चार मका खरेदी केंद्रावर जाऊन मका पोत्याचे वजन केले असता काही इलेक्ट्रिक वजन काट्यामध्ये तफावत आढळल्याने त्यांनी लेखी तक्रार केली असता. लागलीच सोलापूर जिल्हा उपनियंत्रक वैधमापन शास्त्र विभागाचे अ.ध. गेरमे आणि ए.वाय. इंगोले निरीक्षक वैदमापन शास्त्रीय अकलूज यांनी वेळापुर मधील मका खरेदी केंद्रावर जाऊन तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा आघाडी तालुका अध्यक्ष अजित कोडक, दीपक सावंत यांच्या समक्ष इलेक्ट्रिक वजन काट्यांची तपासणी केली असता वेळापूर येथील संतोष ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे शेतकरी अंबादास मुरलीधर बागल यांच्या मका पोत्यांचे वजन केले असता ते बरोबर आले आहे पण संतोष ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे एक दशांश पर वजने उपलब्ध नसल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच गजानन भीमाशंकर शेटे यांच्याकडे असलेली वजने विहित मुदतीत पडताळणी न केल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. शेतकऱ्याकडून घेतलेल्या मालाचे फेर वजन केले असता बरोबर आहे. तसेच पंढरपूर रोड येथील सद्गुरु ट्रेडर्स वेळापूर येथे विधी ग्राह्य त्रुटी पेक्षा जास्त त्रुटी आढळले म्हणून फेर पडताळणी व मुद्रांकन करून घेण्यासाठी रीतसर तीन ए.नोटीस त्यांना बजावली, उपयोग कर्त्याकडे एक दशांश पर वजने उपलब्ध नसल्याने विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are Registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000026238 E-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:20/2022-2023 **Particulars:** Construction of 220kV TBC bay at 220 kV Pandharpur & Malinagar Substation under EHV O&M Division, Solapur. **Estimated Cost:** Rs. 92,94,535/- **EMD: (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 92,945/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST i.e. Rs. 525/- **Sale Period:** 21.02.2023 to 01.03.2023 **Last Date of Submission:** 01.03.2023 up to 14:00 Hrs. **Date of Opening (Tech. Bid):** 01.03.2023 at 14:30 Hrs (If possible). **Contact Person:** Executive Engineer - 77447440613.
For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**
**Pre-Bid Meeting:** 24.02.2023 @ 12:30 Hrs at EHV O&M Circle Office, Solapur.
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL..

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**




**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत व्यवसाय)**
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर**
**सिंचन भवन, गुरुनानक चौक, सोलापूर क्लब जवळ, सोलापूर.**
**दूरध्वनी क्रमांक-०२१७-२७३२८५५** Email-eemid1solapur@gmail.com

**ई-निविदा सूचना क्रमांक.०१ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१. सोलापूर हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या वतीने सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://Mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवण्यात येत आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.


| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित रक्कम रू.लक्ष (वस्तु व सेवाकर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | धुबधुबी मध्यम प्रकल्प शिरवळ, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर येथील उजवा तीर कालव्यावरील कि.मी.१ ते ५ मधील उर्वरित मातीकामाचे बांधकाम करणे. | सोलापूर | ५१.६७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि.२३/०२/२०२३ ते दि.०९/०३/२०२३
जिओटॅगींग उपलब्ध कालावधी :- दि.२३/०२/२०२३ ते दि.२७/०२/२०२३
ई-निविदा उघडणे :- दि.१०/०३/२०२३ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. ई-निविदा संबंधी काही अतिरिक्त माहितीसाठी वरील संकेतस्थळावर तसेच संबंधीत हेल्पकोड २४/७ फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
२. निविदा सुचनेबाबतची सविस्तर माहिती व इतर माहितीसाठी खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. व सदर नोटीसमध्ये काही बदल झाल्यास खालील संकेतस्थळावर सूचित करण्यात येईल.
Portal: https://Mahatenders.gov.in

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, सोलापूर**

**विमाका-पुणे-जाहि-२६६-२०२२-२३**





## मांजरी ग्रामपंचायतीचा अनोखा उपक्रम शाळा केली वीज बिल मुक्त

**सांगोला** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाधव वस्ती येथे ग्रामपंचायत मांजरी यांच्या वतीने मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी जाधववस्ती शाळा विज बिल मुक्त केली. यासाठी जाधव वस्ती शाळेवर ग्रामपंचायत मांजरी यांच्यावतीने सोलार सिस्टीम जोडण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत मांजरी गावच्या नूतन सरपंच मंगलताई भुसे यांचे प्रतिनिधी पत्रकार सचिन भुसे, सरपंच सचिन शिनगारे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा दुर्गेश्वरी शिनगारे, कॉन्ट्रॅक्टर तुषार जगताप, संभाजी कांबळे, ज्ञानेश्वर शिनगारे, सिद्धेश्वर जाधव उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक पाटणे सर यांनी सर्व मान्यवरांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. शाळेतील सुविधांची व आवश्यक गरजांची माहिती दिली. सरपंच सचिन शिनगारे यांच्या हस्ते नवीन सोलार युनिट पॅनलचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच भुसे यांनी शाळा सर्व भौतिक सुविधांनी सुसज्ज करण्याचे आश्वासन दिले. वर्गशिक्षक मागाडे सर यांनी शाळेतील उपक्रम व पटा विषयी तसेच आवश्यक भौतिक सुविधांची माहिती सांगितली.




## शिवरत्नच्या गोडसे यांना सुवर्णपदक

**अकलूज** : शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न पॅटर्न, अकलूज इ.११वी मधील विद्यार्थी जगजितसिंह बाबासाहेब गोडसे याने १७ वर्षाखालील राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये खुल्या वजन गटात ग्रीको रोमन प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावून गोल्ड मेडल मिळवलेले आहे. त्याच्या या सुवर्ण कामगिरीचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा यांचे वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये गोडसे यांनी हे यश संपादन केले असून त्याच्या या यशाबद्दल त्याचे व त्याच्या पालकांचे शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा तथा शिवरत्न पॅटर्नचे चेअरमन शितलदेवी मोहिते-पाटील व सर्व संचालक मंडळ तसेच प्रशालेचे प्राचार्य, समन्वयक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**उत्तर सोलापूर** : शासनाच्या आदेशानुसार पंचायत समिती उत्तर मध्ये मराठी पत्रकारितेचे जनक, थोर समाजसुधारक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पंचायत समिती उत्तर सोलापूर येथील सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन कनिष्ठ प्रशासन अधिकारी एन.डी. धोत्रे यांच्या हस्ते, शुभांगी खरबस, एस.आर.राठोड, आर. के. राजगुरु, पी.पी.भांडारकर, एन.पी.तरटे, एन.एस.तोडकर, जे.आर. अन्सारी, जे.एस. लामकाने, ए.व्ही. वस्त्रद, व्ही.एस.केंगळे, एस. जी. लांडगे, एस.व्ही.अलकंटे, के. एस.शिंदे, एस एम.तांबोळी, म्हेत्रे, धिरज शिंदे, अप्पाशा पचन्गे उपस्थीत होते.



## सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे गावडीदारफळात अनावरण

**उत्तर सोलापूर** : गावडीदारफळ येथील गावातील ग्रामपंचायतिच्या वतीने मुख्य चौकात लावण्यात आलेल्या सी सी टीव्हीचे उद्घाटन ग्रामपंचायत कार्यालयात सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. .यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, सरपंच भारत माळी, उपसरपंच कल्याण काळे, ग्रामसेविका ननवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. शिवजयंती निमित्त ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजनही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. चौदाव्या वित्त आयोग निधीतून ग्रामपंचायतच्या वतीने मुख्य चौकात ५० हजार रुपये किमतीचे चार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. सीसीटीव्हीमुळे गैर कृत्य, चोरी व इतर घटनांना आळा बसणार आहे. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना शिंदे ह्यांनी सूचना करण्यात आल्या. यावेळी प्रभाकर पवार, परमेश्वर थिटे, दयावान पवार, नानासाहेब शंकर पवार, पप्पू भंडारे, सचिन पवार, डॉ. सुनील कदम, अमोल बनसोडे, दिगंबर पोपळे, शाहू धर्मशाळे, केशव कदम, शत्रुघ्न पवार, दिलीप काळे, सचिन पवार व इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## वृत्तपत्र विक्रेते बिभीषण पवार यांचे निधन



**टेंभुर्णी** : बेंबळे येथील बिभीषण आगतराव पवार (वय ५१) यांचे मंगळवार दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी अल्पशा आजारांने निधन झाले. ते वृत्तपत्र विक्रेते म्हणून सर्व परिचित होते. त्यांचे पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. भीमा नदीच्या तीरावर वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिवजयंती 'नाचून' नव्हे तर 'वाचून' साजरी

## शिवजयंतीचे औचित्य साधत तरूणाने दिले एक हजार शिवचरित्र मोफत

**सुराज्य/दीपक शेळके**

एकी कडे शिवजयंतीचा जल्लोष सर्वत्र सुरूअसताना ... कुठे मिरवणूकीवर लाखो रूपये खर्च केले जात असताना सोलापूरातील एक तरूण शिवजयंती मनामनत शिवजयंती घराघरात उपक्रमा अंतर्गत शिवजयंती 'नाचून' नाही तर 'वाचून' साजरी करण्याचा संदेश देत त्यासाठी त्या तरूणांने 'शिवचरित्र आणि विचारप्रवाह' या शिवचरित्राच्या एक हजार प्रति मोफत भेट देऊन शिवजयंती अनोख्या पध्दतीने साजरी केली.

मुरारजी पेठ राहणाऱ्या ओम धनंजय चव्हाण असे या तरूणाचे नाव आहे. त्यांचे शिक्षण मेकॅनिकल डिप्लोमा झाले आहे. त्यांचे स्पेअरपार्टचे दुकान आहे. त्यांने एके दिवशी इतिहासकार डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान ऐकेले आणि छत्रपती शिवाजी महाराजाच्या विचाराने प्रभावित झाला मात्र शिवजयंती दिवशी काढल्या जाणाऱ्या मिरवणूका, त्यावर होणारा खर्चामुळे व्यतीत झाला. छत्रपती शिवाजी महाराज हे डोक्यावर घेऊन नाचण्यासाठी नव्हे तर डोक्यात घेऊन शिवविचार रूजण्याची गरज असल्याने त्यांनी जनजागृती करण्याचा विडा उचला आणि यासाठी त्यांने आपल्या दोन सवगड्यांना घेऊन शिवजयंतीच्या दिवशी एकी कडे जल्लोष सुरू असताना



डॉ. श्रीमंत कोकाटे लिखित 'शिवचरित्र आणि विचारप्रवाह' या शिवचरित्राच्या एक हजार प्रति मोफत भेट देऊन वाचन संस्कृती रूजवत शिवजयंती नाचनू नव्हे तर वाचून साजरी करण्याचा संदेश दिला यासाठी समाजातील डॉक्टर, व्यापारी,शिक्षक,पत्रकार सर्व समजातील घटकांना हे शिवचरित्र मोफत भेट देऊन अनोखी शिवजयंती साजरी केली. त्या तरूणांचे तरूण वर्गातून स्वागत केले जात आहे. तर छत्रपतीचे नाव घेऊन टवाळखोरी करणाऱ्या तरुणांना ोम चव्हाणचा उपक्रम डोळ्यात झणझणित अजंन घालणाराच म्हणावा लागेल.

शिवचरित्र भेट देण्याबरोबर दुचाकी, तीन, चाकी, चार चाकी गाडीवर लावण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज फोटो, प्रतिम मुळे महाराजाच्या होणाऱ्या अवमनावर देखिल तो जनजागृती करत आहे. गाडीवर लावलेल्या महाराजाच्या प्रतिमावर धुळ, घाण, बसत अवामन होते यापासून शिवभक्तांमध्ये जनजागृती साठी सध्या काम करत आहे.

---

छत्रपती शिवाजी महाराजाचा अश्वारूढ पुतळा दररोज स्वच्छ केला करण्याची सेवा सचिन चव्हाण हा तरूण नियमित करतो. त्याला ओम प्रत्येक रविवारी मदत करण्यास जात असतो. त्यावेळी सचिन चव्हाण परिस्थीती बेताची असल्याचे लक्षात येताच त्यांच्या आठवी मध्ये शिकणाऱ्या पृथ्वीराज मुलाचा शैक्षिक जबादारी घेऊन दतक घेण्याचा धानत या कमी वयात दाखवली आहे.

## मसाप जुळे सोलापूरतर्फे आज मराठी भाषा गौरव दिन समारंभ

### पठाण, नानल, जोशी यांचा सन्मान

**सुराज्य/सोलापूर**



डॉ. नसीमा पठाण



सौ. अंजली नानल



सौ. अपर्णा जोशी

महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्यावतीने येत्या बुधवारी मराठी राजभाषा गौरव दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती परिषदेचे शाखा अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दिली.

विजापूर रोड भागातील जवान नगर येथे आनंदश्री प्रतिष्ठानच्या सभागृहात होईल.

याच समारंभात ज्येष्ठ साहित्यिक डॉ.नसीमा पठाण यांना कर्नल प्रभाकर लांडगे स्मृती पुरस्कार, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या अंजली नानल यांना स्व. शंकर लक्ष्मण पांडे पुरस्कार, तर ज्येष्ठ कलावंत अपर्णा जोशी यांना स्व.सुनेत्रा कुमठेकर स्मृती पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर यांच्या हस्ते आणि कुंभारी येथील अश्विनी सहकारी ग्रामीण रुग्णालयातील माजी अधिष्ठता डॉ.माधवी रायते यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. यावेळी स्व.सुमन आणि स्व.भगवंत कुलकर्णी स्मृती शैक्षणिक शिष्यवृत्ती ज्ञानसंपदा प्रशालेतील दहावीचा विद्यार्थी विजय तेली याला दिली जाणार आहे, अशी माहितीही कुलकर्णी यांनी दिली.




## शिवबाबांच्या वाढदिवसानिमित्त नागरी सत्कार व साड्यांचे वाटप

**सुराज्य/अकलूज**

अकलूज गावचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उदयनगर चौंडेश्वरवाडी येथे यथोचित नागरी सत्कार करण्यात आला तर यावेळी गोरगरीब महिलांना सौ.देवन्या मोहिते पाटील यांच्या हस्ते साडी वाटप करण्यात आले.सदर प्रसंगी पन्नास किलो वजन गटात त्रिमूर्ती केसरी व वेट लिफ्टींग मध्ये मिळवलेल्या यशाबद्दल यशराज हिरालाल मोरे व अभिजित विशाल करे यांनी कुस्ती छोट्या गटात द्वितीय क्रमांक मिळवल्याबदल शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी चौंडेश्वरवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच अनिल कोयले ग्रामपंचायत सदस्य प्रशांत मोहिते सोनाली गवळी शीला गायकवाड सुजाता शिंदे संगीता एकतपुरे सचिन गिरमे विजया माने माजी सरपंच सतीश शिंदे संजय कडाळे दत्तात्रय देशमुख संताजी देशमुख व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



## कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयात १२वी परीक्षा शांततेत

**सुराज्य/अक्कलकोट**

कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार दि २१ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या इ.१२ परीक्षेच्या पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाच्या परीक्षेत केंद्र क्र. ५१९ मध्ये एकूण ३४९ विद्यार्थी उपस्थित होते. यावर्षी शासनाकडून कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत असल्याने परीक्षा शांततेत व सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. वेगवेगळी भरारी पथके व परीक्षा केंद्रावर बैठे पथक नेमल्यामुळे परीक्षेत कोणत्याही प्रकारचे गोंधळ अथवा गैरप्रकार दिसले नाही. आत्ताचे १२ वी चे परीक्षार्थी हे पहिल्यांदाच बोर्ड परीक्षा देत आहेत. त्यामुळे नियोजन केल्याप्रमाणे परीक्षा शांततेत सुरू असल्याचे केंद्रप्रमुख मलकप्पा भरमशेट्टी यानी सांगितले. यावेळी उपकेंद्र संचालक खंडेराव घाटगे, परीक्षा प्रमुख सिद्रामप्पा पाटील, परिरक्षक सुरेश रूगे आदी शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## दोनशे लीटर ऑईल चोरी

**सांगोला** : सांगोला अकलूज या राष्ट्रीय महामार्गावरील सांगोल्यापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या एकतपुर पाटील जवळ असलेल्या कृषी विकास सहकारी संस्थेच्या कोल्ड स्टोरेज मधील दोनशे लीटर अंदाजे ३० हजार रुपये किमतीचे ऑइल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ११ फेब्रुवारी २३ रोजी घडली. याबाबत सांगोला पोलीस स्टेशन मध्ये संस्थेच्या मुख्य लिपिका रशिदा महबूब उकली यांनी फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस स्टेशन करीत आहे.



## राष्ट्रमाता जिजाऊंनी शिवरायांना घडवून मराठी मुलुख सुरक्षित केला

### हिवरकर-पाटील यांचे प्रतिपादन

**सुराज्य/नातेपुते**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराशी निगडित राहून समाजसेवा केली पाहिजे आपल्या वयात आपण शिक्षणा कडे लक्ष दिले पाहिजे आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे.

राष्ट्रमाता जिजाऊंनी शिवाजी महाराज घडवले नसते तर कदाचित आपल्या कपाळावर कुंकू दिसलं नसतं महाराष्ट्राच्या मातीत छत्रपती शिवाजी महाराजांसारखा राजा जन्माला आल्यामुळे व शिवाजी महाराजांना राष्ट्रमाता जिजाऊंनी घडवल्यामुळे मराठी मुलुख हा सुरक्षित राहिला असल्याचे मत शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील आपले विचार व्यक्त करीत असताना म्हणाले

ते शिवजयंतीचे औचित्य साधून नातेपुते येथील अक्षय शिक्षण संस्था जिल्हा परिषद कन्या शाळा जिल्हा परिषद बरडकर मळा या ठिकाणी विद्यार्थ्यांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे , आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत, जिल्ह्याचे शिवसेनेचे नेते तथा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय साहित्य व खाऊवाटपाच्या घेण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमासाठी माळशिरस शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील नातेपुते शहर उपप्रमुख पोपटराव शिंदे, संदेश बरडकर, नातेचे शहरचे संघटक ऋषिकेश बरडकर, दत्ता बोडरे, अण्णासाहेब जाधव, आनंदराव लोंढे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## पंढरीत शंभर कामगारांना मिळणार दररोज मध्यान्ह भोजन

**सुराज्य/पंढरपूर**

कामगार कल्याणकारी मंडळाकडून असंघटित वर्गातील कामगारांसाठी विविध योजनांचा समावेश केला आहे.

रोजगार व सेवाशर्ती नियमन कायद्यानुसार असंघटित कामगारांना राज्य शासनाकडून सुरक्षा, आरोग्य, मुलांसाठी स्कॉलरशिप, दुर्घटना विमा, गट विमा, वैद्यकीय खर्च, महिला कामगारांसाठी मातृत्व लाभ,



आरोग्य तपासणी, गृहनिर्माण योजना, मध्य अन्न योजना इत्यादी उपाययोजनांचा व सुविधांचा लाभ असंघटित कामगारांना मिळवून देण्याचे काम सत्यशोधक कामगार संघटनेचे मार्गदर्शक रवी सर्वगोड यांच्या प्रयत्नातून केले जात आहे.

कार्यक्रमासाठी प्रदीप परकाळे, विजय शिकतोडे, राजाभाऊ ढवळे, बाळासाहेब साखरे, मारुती प्रक्षाळे, समाधान भोसले, सुरेश सर्वगोड, गणपत सर्वगोड, सुरेश बिनवडे, प्रफुल्ल कांबळे, भारत सोनवले, विशाल ऐदाळे, इंद्रजीत वाघमारे, सिध्दनाथ सावंत, गणेश ननवरे, संतोष सर्वगोड, सागर धनवजीर, आनंद सर्वगोड, स्वप्निल सर्वगोड, युवराज माने, सीताराम वाघमारे, जयसिंग माने, स्वप्निल कांबळे, आकाश सर्वगोड, भुषण सर्वगोड इत्यादी उपस्थित होते.

# खेळाबरोबर शिक्षण अत्यंत महत्त्वाचे : आयरनमॅन राडकर

**सुराज्य/पुणे**

जीवनात यशस्वी होण्यासाठी खेळा बरोबर शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. कठिण परिश्रम, खिलाडीवृत्ती व आनंदाने खेळ खेळल्यास यश त्याचा पदरी पडते. त्यामुळे खेळ आणि शिक्षण कधीही सोडू नका. असा सल्ला ३३ वेळा आयरनमॅन ट्रायथलॉन झालेले कौस्तूभ राडकर यांनी खेळाडूंना दिला.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या १६वी राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धा एमआयटी डब्ल्यूपीयू समिट-२०२३ या क्रीडास्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. माजी भारतीय टेनिस खेळाडू गौरव नाटेकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड हे होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, प्र-कुलगुरू डॉ. तपण पांडा, कुलसचिव गणेश पोकळे, डब्ल्यूपीयूचे क्रीडा संचालक प्रा. डॉ.पी.जी. धनवे, स्पर्धेचे सल्लागार मंदार ताम्हाणे व योगेश नातू, प्रविण पाटील, पी.जी.भींडे व विलास कथुरे उपस्थित होते. उद्घाटन




समारंभात समारंभात क्रीडा क्षेत्रात भरीव कामगीरी केल्याबद्दल भारतीय लिंगेन रमेश तावडे यांना एमआयटी-डब्ल्यूपीयू क्रीडा महर्षि पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र व पदक असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

कौस्तूभ राडकर म्हणाले, ३३वेळा आयरनमॅन ट्रायथलॉन मिळण्याचा बहुमान मिळविणारा मी एकमात्र भारतीय व्यक्ती आहे. ही स्पर्धा जगात अत्यंत कठीण मानली जाते. त्यात स्वीमिंग, सायकलिंग सारख्या खेळांचा समावेश असतो. विद्यार्थ्यांना जीवनाता एक तरी खेळ खेळावा. त्याचबरोबर आपल्या शिक्षणाला अधिक प्राथमिकता दयावी.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड म्हणाले, विद्यार्थ्यांनी शरीराने तंदुरूस्त, मनाने सतर्क, अध्यात्मिक दृष्य उन्नत आणि कुशाग्र बुध्दीमत्ता असणे आवश्यक आहे.

स्वामी विवेकानदांनी ही सांगितले की युवकांनी खेळाच्या मैदानात उतरावे. विद्यार्थ्यांनी चारित्र्यवान तसेच शिस्तबध्द असल्यास जीवनात यश मिळते.


राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, राष्ट्रउभारणीसाठी खेळाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. शिक्षणाबरोबरच मुलांनी एक तरी खेळ खेळावा.

या स्पर्धेत पुणे विभागातून ४० अभियांत्रिकी महाविद्यालये, उर्वरित महाराष्ट्रातून १०, इतर राज्यातील ३ महाविद्यालय, तसेच पुण्यातील खाजगी विद्यापीठे १०, महाराष्ट्रातून ४, बाहेरच्या राज्यातील ७ विद्यापीठे सहभागी झाले आहेत. या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे मिळून एकूण सुमारे ३,६०० स्पर्धक भाग घेतला. सिध्दार्थ गाडिलकर व जान्हवी भोसले यांनी सूत्रसंचालन केले. आर्यन यादव यांनी आभार मानले.



## गिरझणी रोड बायपास चौकाचे महाराणा प्रतापसिंह चौक नामकरण

✔ **अकलूज** : शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अकलूज येथील गिरझणी रोड बायपास चौकास महाराणा प्रतापसिंह चौक असे नामकरण शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील व अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अकलूज येथील राजपूत घिसाडी समाजाचे अध्यक्ष -रणजीत बाबा साळुंखे, उपाध्यक्ष- विनायक (राजूभाऊ) चिंतामणी पवार, मार्गदर्शक -दत्ता आबा पवार, विश्वनाथ हिरालाल साळुंखे ,दीपक बलभीम पवार, नागेश दत्तात्रय पवार, दीपक मारुती पवार' सतीश विश्वनाथ पवार ,सुनील तुकाराम चव्हाण, सदस्य किशोर बाबासाहेब साळुंखे, दीपक मनोहर चव्हाण विक्रम सदाशिव साळुंखे, सुनील पोपट साळुंखे ,अण्णा सिद्धू पवार, रविराज रमेश पवार ,रोहित तानाजी पवार ,आकाश दत्ता साळुंखे, नाना नागनाथ पवार, संतोष तानाजी साळुंखे, महेश रवींद्र पवार, कन्हैया बबन चव्हाण ,अजित भीमा पवार, विकास धोंडीबा साळुंखे, विक्रम अशोक साळुंखे ,रुपेश रामभाऊ पवार ,सचिन सूर्यकांत साळुंखे, शुभम वामन पवार, दादा तानाजी साळुंखे अजय बाबासाहेब साळुंखे ,अभिषेक सुभाष साळुंखे, बापू दत्ता साळुंखे, संतोष मच्छिंद्र पवार ,लखन अशोक पवार, शिवकुमार चंद्रकांत साळुंखे, राहुल चातुर पवार ,बालाजी पांडू पवार, इंद्रजीत मुन्ना साळुंखे, विनोद मच्छिंद्र पवार सुनील तानाजी साळुंखे अमोल गजानन साळुंखे, बापु उमाजी साळुंखे.विनोद प्रकाश साळुंखे आदि समाज बांधव उपस्थित होता. या चौकाचे महाराणा प्रतापसिंह चौक नामकरण झाल्याने राजपूत घिसाडी समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करावे : कुमार ढवळे

✔ **मोहोळ** : तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करावे असे विचार आंबेडकरी चळवळींचे नेते रिपब्लीकन कर्मचारी (आठवले) कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र उपाध्यक्ष कुमार ढवळे यांनी व्यक्त केले. सय्यद वरवडे (ता.मोहोळ) येथे रिपब्लीकन पार्टी युवक आघाडीच्या वतीने छ शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ढवळे हे बोलत होते यावेळी युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष तात्यासाहेब काळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुढे बोलताना ढवळे म्हणाले की छ शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्मातील लोकांच्या कल्याणाचा विचार केला होता बहुजन समाजाला सोबत घेवून स्वराज्य साकारले होते तरुण पिढींने याचा विचार करून काम करावे असे ते म्हणाले या कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर व छ शिवाजी महाराज यांचे उपास्थित मान्यवरांचे हस्ते पुजन करून करण्यात आली यावेळी रिपाईचे मोहोळ तालुका अध्यक्ष नानासाहेब सोनवणे राजेंद्र फडतरे अंकूश शेंडगे पोपट कापूरे आबासाहेब कुचेकर महेश कुचेकर सुनील शेंडगे आनंद कुचेकर केदार कांबळे अमोल जगताप विक्रम भालेराव आदीसह रिपाईचे कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तिल्हेहाळ येथे महाशिवरात्री साजरी

✔ **दक्षिण सोलापूर** : तिल्हेहाळ येथील जागृत महादेव मंदिरात महाशिवरात्री उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. मन्नुसिंग रजपूत यांच्या संकल्पनेतून ग्रामस्थांच्या सहकार्याने साकारलेल्या महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त शनिवार दि. १८ फेब्रुवारी रोजी पहाटेपासून होमहवन, अभिषेक आणि सकाळी ८ वाजता महाआरती करण्यात आली. त्यानंतर दिवसभर फराळ व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हनुमान भजनी मंडळ (तिल्हेहाळ) , हनुमान भजनी मंडळ (हिपळे), रेवणसिध्द भजनी मंडळ (औज (आ.),चौपाड विठ्ठल महिला भजनी मंडळ (सोलापूर) यांचा भजनचा अखंड कार्यक्रम सादर करण्यात आला. व सायं.५:३० वाजता वळसंगचे एपीआय अनिल सनगले व चेट्टीनाड सिमेंटचे युनिट हेड श्रीनिवास बाबु, झुवारी सिमेंटचे हेडलबर्ग दिपक ककड यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. रात्री ९ वाजता प्रसिद्ध भारुडकार देविदास जगताप (सोलापूर), एकनाथ शिंदे (ति-हे), दशरथ वराडे (शिरापूर), ईलाही खलिफा (सांगोला), दत्तात्रय देढे (लोहगाव), महांतेश घंटे (हालचिंचोळी) पेटी मास्तर युवराज जाधव यांचा भारुडाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. तसेच रविवार दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८;३० महाआरती व त्यानंतर ९ वाजल्या पासून होटगी स्टेशनचे राजू चोरमले यांच्यातर्फे महाप्रादाचे वाटप करण्यात आले. यावेळी तिल्हेहाळ, औज(आ.), होटगी स्टेशन, आहेरवाडी, फताटेवडी, सोलापूर आदी भागातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिर पंच व तिल्हेहाळ ग्रामस्थ विशेष परिश्रम घेतले.

# अनगर येथे जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण

## चौघांवर गुन्हा दाखल

✔ **मोहोळ** : अनगर येथील शिवजयंती निमित्त चालु असलेला अभिषेक पाहण्यासाठी थांबलेल्या मागसवर्गीय इसमास जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना रविवारी घडली असून याबाबत मंगळवारी ४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिपक गौतम उघडे हा अनगर येथील शासन मान्य मका खरेदी केंद्रावर मजूरीने कामाला जात असतो .या ठिकाणी सात -आठ महिन्यापूर्वी फिर्यादीच्या ओळखीचे जयसिंग चक्रपाणी गुंड अक्षय राजेंद्र कारमकर हे दोघे मका खरेदी केंद्रावर येवून आमची मका अगोदर घे मग बाकिच्याची घे असे उघडे यास म्हणत असताना त्यांने त्यांचे ऐकले नाही नंबर प्रमाणे घेतो असे त्याना म्हणाला . याचा राग त्यांच्या मनामध्ये होता . तू अनगर मधला असून आमचे ऐकत नाही असे त्यास हे सर्व जण जाता येता वारंवार त्याला मारण्याची धमकि देत होते . ही गोष्ट त्याने आपले मित्र खरेदी केंद्रावर काम करणारे शंकर हनुमंत गुंड आणि राहुल पासले यांनाही सांगितले होते. दि.१९ रोजी शिवजन्मोत्सवानिमित्त अनगर नगरपंचायत शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिषेक करण्यासाठी पाहण्यासाठी थांबला होता . त्यावेळी ओळखींचे जयसिंग चक्रपाणि गुंड ,जयवंत महादेव थिटे ,अक्षय राजेंद्र कारमकर ,प्रथमेश जयसिंग गुंड सर्व अनगर तालुका मोहोळ यांनी येऊन शिवाजी महाराज आमचे आहेत , तू खालच्या जातीचा आहे आणि तो आमच्या गावातला असून आमची मका लवकर घेत नाही सहकार्य करत नाही कशाला थांबलाय तू निघून जा असे म्हणून सार्वजनिक ठिकाणी पाणउतारा करण्याच्या उद्देशाने फिर्यादीस शिवीगाळ केली आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण केली . त्यावेळी फिर्यादीचे ओळखींचे भागवत खेला शिंदे, किरण अनंता गुंड , शोएब असलम मुलाणी यांनी सोडवासोडवी केली आणि फिर्यादीला घरी पाठवले .पण फिर्यादी घाबरलेला असल्यामुळे त्यांनी मंगळवारी येऊन जयसिंग चक्रपाणी गुंड ,जयवंत महादेव थिटे, अक्षय राजेंद्र कारमकर आणि प्रथमेश जयसिंग गुंड या सर्वांविरुद्ध फिर्याद दिली असून या प्रकरणी पोलिसांनी भा.दं. वि.सं. कलम ३२३,५०४,५०६,३४,आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### कोयता आणि दगडाने मारहाण

✔ **अकलूज** : येथील क्रांती सिंह नगरात पूर्वीच्या भांडणावरून कोयता, दगड आणि काठीने झालेल्या मारहाणी महिलेसह दोघेजण गंभीर जखमी झाले ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी दोन महिलासह १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दीपक सदाशिव काळे (वय १९) आणि त्यांची आत्या सकराबाई सोनबा चौगुले (दोघे रा. क्रांतिसिंह नगर) असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. या संदर्भात जखमी दीपक काळे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी ऋषी राजू पवार, दिलीप चौगुले, रोहित पवार, संतोष पवार, शुभम पवार, सोहम धोत्रे, प्रदीप पवार, ओंकार माळी, रंजीत पवार, सोमा पवार, उमा औदुंबर काळे आणि मंगल लक्ष्मण पवार (सर्व रा.क्रांतिसिंह नगर) अशा १४ जणाविरुद्ध बेकायदेशीर जमाव जमावून मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला. दीपक काळे आणि त्यांची आत्या सकराबाई चौगुले असे दोघे काल दुपारी क्रांतिसिंह नगरातील बुवा यांच्या किरणा दुकानासमोर थांबले होते. यावेळी वरील आरोपींनी मिळून त्यांना कोयता, दगड आणि काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार बोराटे करीत आहेत.

### मुकादमास काठीने मारहाण

✔ **अक्कलकोट** : कामावरून काढून टाकले, आणि पगार अडवून ठेवण्यास तूच जबाबदार आहे. या कारणावरून साखर कारखान्यातील मुकादमास काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना रुद्धेवाडी येथील मातोश्री साखर कारखान्याच्या गोदामात रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मंगलदास शंकर पुजारी (वय २२ रा. कल्लप्पावाडी ता.अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चनमलप्पा अर्जुन पुजारी आणि शंकर यल्लप्पा गजरी (रा.रुद्धेवाडी) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मंगलदास पुजारी हे रविवारी रात्री कारखान्याच्या गोदामात काम करीत होते. त्यावेळी पुजारी याच्यासह दोघे गोदामात घुसून पाटील साहेब कुठे आहेत? त्यांना पगार देण्यास सांग. तूच आमचा पगार अडवून ठेवण्यास सांगितले. असे म्हणत त्यांना काठीने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार कोळी पूढील तपास करीत आहेत.



## विकास आघाडीच्या विजयाने सांगोल्यात परिवर्तनाची नांदी : साळुंखे

✔ **सांगोला** : प्राथमिक शिक्षक सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका विकास आघाडी पॅनलने गुरु सेवा पॅनलचा दारुण पराभव करत एकाहाती सत्ता मिळवली आहे. विकास आघाडीच्या या यशामुळे सांगोला तालुक्यात परिवर्तनाची नांदी झाली आहे. असे शुभेच्छापर मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केले.

शिक्षक सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका विकास आघाडीच्या नवनिर्वाचित संचालकांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी च्या वतीने युवक नेते डॉ. पियुषदादा साळुंखे पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित संचालक यांनी कार्यतपस्वी आमदार कै. काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून आशीर्वाद घेतले. सुमारे ८०० सभासद असणाऱ्या सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक सह. पतसंस्था अर्थात तालुका सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये तालुका सोसायटी विकास आघाडी सांगोलाचे सर्वच्या सर्व १३ उमेदवार १०० ते १२५ मतांच्या फरकाने निवडून आले असून गुरुसेवा पॅनलचा धुव्वा उडाला आहे. काल सांगोला येथे जि.प. शाळा पुजारवाडी येथे निवडणूक होऊन लगेचच मतमोजणी झाली.त्यामध्ये तालुका सोसायटी विकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना ४२० ते ५०१ मते प्राप्त झाली असून गुरुसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना ३२० पर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे सर्वच्या सर्व तेरा जागांवर दणदणीत विजय मिळाला. यामुळे शिक्षकांमध्ये एक नवचैतन्याचे वातावरण पसरले आहे. ६२ वर्षांची परंपरा असलेल्या तालुका सोसायटीला निवडणुकीने आता नवे कारभारी मिळणार आहेत. सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक समिती, सांगोला तालुका प्राथमिक शिक्षक संघ थोरात गट व जुनी पेन्शनच्या पाठिंबावर उभा राहिलेले तालुका सोसायटी विकास आघाडी पॅनल ने दणदणीत यश मिळवून पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांना मोठी चपराक दिलेली आहे. निवडणुकीमध्ये सर्वसाधारण गटातून भागवत भाटेकर, संजय काशीद पाटील, बाबासाहेब इंगोले, सतीश सपताळ, हमजू मुलाणी, बाळासाहेब बनसोडे, विजयकुमार इंगवले, संतोष कांबळे निवडून आले आहेत.

तर महिला प्रवर्गातून नयना पाटील व सावित्रा कस्तुरे, इतर मागास प्रवर्गातून मुरलीधर गोडसे, अनुसूचित जातीमधून राहुल चंदनशिवे तर भटक्या जाती जमातीतून सुहास वलेकर यांची निवड झाली आहे. निकाल जाहीर होताच गुलालाची मुक्तहस्ते उधळण करून सांगोला शहरांमध्ये मिरवणुकीने सर्व महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच आ.दीपकआबा साळुंखे पाटील यांचे कार्यालयामध्ये सर्व उमेदवारांचे सत्कार करण्यात आला. मिरवणुकीची सांगता तालुका सोसायटीच्या कार्यालयात करण्यात आली. याप्रसंगी डॉ. पियूषदादा साळुंखे पाटील व डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नवनियुक्त संचालकांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## खिलारवाडी येथे साडेसहा लाखांचे दागिने पळविल

✔ **सोलापूर** : किराणा दुकानाच्या बाजूस असलेल्या खोलीच्या दरवाजा उचकटून चोरट्याने दुकान आणि घरातील कपाटातून रोख रकमेसह ६ लाख ४७ हजाराचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी खिलारवाडी (ता.सांगोला) येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली.

खिलारवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर आनंदराव रामचंद्र होळकर हे राहण्यात असून त्याच्या घराजवळ आशीर्वाद किराणा आणि जनरल स्टोअर नावाचे दुकान आहे.रविवारी रात्री त्यांनी उशिरा दुकान बंद करून घरी गेले होते. पहाटेच्या सुमारास चोरट्याने दुकानाच्या पाठीमागे असलेल्या बंद असलेल्या खोलीचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला. आणि कपाटातील १६४ ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच दुकान आणि घरातील असे मिळून रोख १ लाख ५० हजार रुपये असा एकूण ६ लाख ४७ हजाराचा माल लुटून पोबारा केला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर होळकर यांनी सांगोला पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक राजुलवार करीत आहेत.

## आजपासून मार्डीत लक्ष्मणशक्ती सोहळा

✔ **उत्तर सोलापूर** : साडेतीन दशकानंतर श्रीक्षेत्र मार्डी येथे सुरु असलेल्या एकनाथी भावार्थ रामायण पारायणातील लक्ष्मणशक्ती-मुक्तोत्सव सोहळ्याला बुधवार दि. २२ रोजी सायंकाळी सहा वाजल्यापासून सुरुवात होत असून गुरुवार दि. २३ रोजी सकाळी सहा वाजता महाआरती व महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार असल्याची माहिती रामायण निरुपणकार बाळासाहेब भाकरे यांनी दिली.

परतीस वर्षानंतर होत असलेल्या या लक्ष्मणशक्ती मुक्तोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी मार्डी गावातील हिंदू-मुस्लीम बांधव एकवटले आहेत. सदगुरु बैठक परिवार, नागनाथ भजनी मंडळ, पांडुरंग भजनी मंडळ, संतशिरोमणी सावता माळी भजनी मंडळ, रुक्मिणीदेवी भजनी मंडळ, इंद्रायणी भजनी मंडळ, विठ्ठल बिरुदेव ओवी मंडळ, छत्रपती शिवाजी मराठा युवा, क्रीडा, सांस्कृतिक व शिक्षण मंडळ, नागेश युवक मंडळ, जय मल्हार युवक मंडळ, महात्मा फुले तरुण मंडळ, धर्मवीर संभाजीराजे तरुण मंडळ, शाही मस्जिद ट्रस्ट, मुस्लिम युवक मंडळ, शिव-बसव समाजसेवी संस्था, वीरशैव कक्कय्या तरुण मंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे तरुण मंडळ, शिवतेज प्रतिष्ठान, स्वराज्य निर्माता प्रतिष्ठान, शेतकरी संघटना आदी मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या सोहळ्यात उत्फुर्तपणे सहभागी झाले आहेत. विजयादशमीपासून दररोज पहाटे गावातून सुरु असलेल्या रामटाळीमुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले आहे. बुधवार दि. २२ रोजी दुपारी दोन वाजता मार्डी -होनसळ रस्त्यावरील तुळजाभवानी देवींच्या (पावकाई ) ठाण्याजवळ वनवासाला गेलेल्या ४३ भाविकांचे आगमन होईल.

गावच्या सरपंच प्रांजली पवार व त्यांचे पती गणेश पवार यांच्या हस्ते प्रभुरामरायांच्या प्रतिमेचे, पादुकांचे, वीणा पूजन होईल. सर्व वनवासी भाविकांना पुष्पहार अर्पण करुन त्यांचे औक्षवण करण्यात येईल. ओवी मंडळाचे गजे ढोल, नागनाथ भजन, टाळमृदंगाच्या जयघोषात व संभळ वादनासह वनवासी भाविकांसह गावातून रामटाळी मार्गावरुन दिंडी मिरवणूक निघेल. दिंडी मार्गावर रांगोळ्या व फुलांच्या पायघड्यांची सजावट करण्यात येणार आहे. गावातील प्रत्येक घरावर भगवी पताका लावण्यात आल्या आहेत. सायंकाळी सहा वाजता पेठेतील मारुती मंदिराच्या समोर रामायणातील लक्ष्मणशक्ती अध्यायाच्या वाचनाला सुरुवात होईल. ग्रामदैवत श्री नागनाथ देवस्थानचे खर्गे नागेश स्वामी, त्यांच्या धर्मपत्नी श्रीदेवी स्वामी, श्री यमाईदेवीचे आद्यभक्त रंगनाथ स्वामी मोकाशी यांचे विद्यमान वंशज दुर्गेश मोकाशी यांच्या हस्ते ग्रंथराज रामायण, ब्रम्हध्वज, गोमातेचे पूजन होईल. आनंद मोकाशी हे यावेळी मंत्रघोष करणार आहेत.

## वेळापूर येथे महिलांचे भगवे वादळ

✔ **वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त १९ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी काढण्यात आलेल्या महिलांच्या पद यात्रेने भगवे वादळ निर्माण झाले होते. सकाळी पालखी चौक येथील पालखी मैदानावर छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिष्ठापना शंकर लावंड व उर्मिला लावंड यांच्या हस्ते करण्यात आली.

यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना माजी. जि प सदस्य सतीशराव माने देशमुख व वेळापूर सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच यावेळी धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. सायंकाळी ५.०० च्या सुमारास शिवजयंतीनिमित्त महिलांची भव्य अशी पदयात्रा वेळापूर शहरातून काढण्यात आली. पदयात्रेत महिलांनी भगव्या रंगाच्या साड्या परिधान करून, डोक्यावर भगवे फेटे बांधून व हातात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले भगवे झेंडे घेऊन, त्यांच्यासमवेत उपस्थित असणाऱ्या शिवकन्या यांनीही नेहरू ड्रेस, भगवे ड्रेस घालून डोक्यावर फेटे बांधून सहभागी झाल्या होत्या. पदयात्रेत महिला, शिवकन्या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पदयात्रा पालखी मैदान येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे तेथे पदयात्रेचा समारोप झाला. यानंतर महिलांच्या उपस्थितीत शिव वंदना महाआरती सह विविध कार्यक्रम संपन्न झाले.

## पुरातन वारसा जतन करणे सर्वांची जबाबदारी : परिचारक

✔ **सुराज्य/पंढरपूर**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती च्या निमित्ताने सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असण्याऱ्या पंढरपूर सायकलर्स क्लब च्या वतीने वाखरी ता पंढपूर येथील ऐतिहासिक बाजीराव विहिरींची महाराष्ट्र बारव मोहिमे अंतर्गत स्वच्छता करून त्या ठिकाणी भव्य व विलोभनीय असा हा दीपोस्तव साजरा करणे ही अभिमानास्पद बाब आहे.

अशा प्रकारचा पुरातन वारसा जतन करणे ही आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी असून येणाऱ्या पिढीला अशा वास्तूंचा अभ्यास करता यावा , त्या बद्दलचा इतिहास माहिती व्हावा या करीता समाजातील जागरूक वर्गाने पुढे येऊन असा वारसा जतन करण्यासाठी प्रयत्न करावेत. विशेषत: युवा वर्गाने पुढे येणे ही काळाची गरज आहे. आमच्या पंढरपूर सायकलर्स क्लब च्या अशा मोहिमे मध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे व पुरातन वारसा जतन करण्यासाठी सामाजिक बांधिलकी समजून काम करावे. असे मत पंढरपूर सायकलर्स क्लब चे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी व्यक्त केले.



यावेळी बोलताना नगरसेवक श्री.अदित्य फत्तेपूरकर म्हणाले की, सर्वात महत्वाचे म्हणजे ही पुरातन विहीर महामार्गात बाधीत होणार होती ती ग्रामस्थ व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने स्वत: केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी साहेब यांच्या मुळे वाचली.अन्यथा हा ठेवा नष्ट झाला असता. आपण तो जपला पाहीजे ही आता सर्वांची जबाबदारी आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी वाखरी गावातील युवक व पंढरपूर सायकलर्स क्लबचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या सर्व सन्माननीय सदस्यांच्या उपस्थीतीत आयोजित करण्यात आलेला दीपोत्सव हा अतिशय विलोभनिय असा होता. या तिहासीक, पुरातन विहीरीवर झालेला दिपोत्सव हा उपस्थितांच्या डोळ्यांचे अक्षरक्ष: पारणे फेडणारा नेत्रदीपक व न भुतो न भविष्यती असाच होता. पंढरपूर सायकलर्स क्लब च्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कतूक होत आहेया वेळी क्लबच्या सदस्यांनी विहीरीची वर पासून खाली पर्यंत सर्व सदस्यांनी अतीशय उत्साहात साफसफाई केली. या निमित्ताने का होईना पण पुरातन वारसा हा लक्षवेधी व्हावा बस..! येणा-या काळात हा वारसा जोपासला जावा,स्वच्छ व पहील्या सारखा निर्मळ व्हावा अशी अपेक्षा क्लबच्या सदस्यांनी व्यक्त केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे चित्य साधुन पंढरपूर सायकलर्स क्लब कडून महाराष्ट्र बारव मोहीम अंतर्गत तालूक्यातील तिहासीक बाजीराव विहीर येथे भव्य व विलोभनीय असा दिपोत्सव साजरा.

सुराज्य Classified

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)


## तडवळे येथे तब्बल ७२ वर्षांनंतर एक गाव एक शिवजयंती साजरी

✔ **बार्शी** : ऐतिहासिक पाऊलखुणा आढळणाऱ्या बार्शी तालुक्यातील तडवळे येथे तब्बल ७२ वर्षांनंतर एक गाव एक शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी समस्त शिवप्रेमींनी एकत्रित येत मध्यरात्री साजरा केलेला शिवजन्मोत्सव आणि गावातून काढलेली शिवपालखी यावर्षीच्या शिवमहोत्सवाचे खास आकर्षण ठरले.

बार्शी तालुक्यातील सगळ्यात शेवटचे गाव असलेले आणि तीन तालुक्यांच्या सीमेवरती वसलेल्या तडवळे गावामध्ये ऐतिहासिक गढी, घोड्याची पागा, भगवती मंदीर, मार्गाई मंदीर, मठ, पुरातन दगडी शिळा, नागोबा अशा अनेक पाऊलखुणांमुळे इतिहासाची नाळ गावाशी जोडल्याचे समोर येत आहे. अशा तडवळे गावामध्ये तब्बल ७२ वर्षांनंतर एक गाव एक शिवजयंती साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे सर्व शिवकन्यांच्या हस्ते छत्रपतींचा जन्मोत्सव मध्यरात्री साजरा करण्यात आला. तर



शिवपालखी मिरवणूक टाळ,मृदुंग, तुतारी आणि ढोल ताशांच्या गजरात काढण्यात आली यावेळी केवळ ऐतिहासिक घटनांचाच वारसा नाहीतर सामाजिक बांधिलकी ही जोपासण्याचा प्रयत्न सकल तडवळे शिवप्रेमींनी केला आहे. त्यांनी जमा झालेल्या वर्गणीतून टाळ मृदुंग वाजवण्यासाठी जमलेल्या वारकरी शैक्षणिक संस्थेला विंधन विहीर पाडण्यासाठी आर्थिक मदत केली आहे.तडवळे जि प प्राथमिक शाळा, गायकवाड वस्ती जि.प शाळा, यशवंतराव चव्हाण प्रशाला आणि तडवळे प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या सहकार्यातून तडवळे गावातील सर्व ग्रामस्थांनी सर्व मतभेद विसरून पहिल्यांदाच एक गाव एक शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. या पार्श्वभूमीवर लहान चिमुकल्यांनी आपल्या गुणदर्शनाचा कार्यक्रम साजरा केला. त्यानंतर मध्यरात्री गावातील महिलांच्या उपस्थितीत शिवकन्यांनी पाळणा गाऊन छत्रपतींचे नामकरण सोहळा पार पाडला.गावातील प्रमुख मार्गाने छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी सवाद्य मिरवण्यात आली. यावेळी बाल शिवाजी, थोरले शिवाजी,स्वराज्याच्या मातोश्री जिजाऊ घोड्यावरती स्वार झालेले पाहायला मिळाले.या मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले ते म्हणजे टाळकरी विद्यार्थी, शेकडो टाळ करी विद्यार्थी आपली कला प्रदर्शित करीत शिवछत्रपतींच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाले.त्यांच्या सहभागाबद्दल ऋणी राहत तडवळेकरांनी त्यांच्या संस्थेमध्ये विंधन विहीर घेण्यासाठी सामाजिक भावनेतून आर्थिक मदत केली आहे.



# मला धक्का दिला, माझा साथीदार वाचला

✔ सुराज्य/मुंबई

लाइव्ह शो नंतर कार्यक्रमातून निघत असताना गायक सोनू निगम याच्यासोबत धक्काबुक्की झाल्याची मोठी बातमी समोर आलीय. चेंबूरमधील एका कार्यक्रमात सोनू निगमसोबत धक्काबुक्की करण्यात आली. आमदाराच्या पोराकडून धक्काबुक्की झाल्याचा दावा समोर केला जात आहे.

आमदार प्रकाश फातर्पेकर यांचे चिरंजीव स्वप्नील फातर्पेकर यांचा सोनू निगमच्या अंगरक्षकांशी सेल्फी घेण्यावरून वाद झाल्याची माहिती समोर आलीय. सोनू निगमसोबत सेल्फी घेण्यासाठी गर्दी झाली होती त्यावेळी स्वप्नील फातर्पेकर हेही तिथे होते.

या गर्दीत सोनू निगमच्या अंगरक्षसोबत किरकोळ धक्काबुकी झाल्यानंतर स्वप्नील यांनीदेखील एका अंगरक्षकाला धक्का दिला त्यावरन हा वाद झाल्याचे समोर येते. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार सोनू निगमला फार इजा झाली नसून त्याच्या एका अंगरक्षकाला आणि मित्राला धक्काबुकीत इजा झाल्याचं म्हटलं जात. या घटनेविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केल्याचं म्हटलं जात आहे.

# जुना पक्ष, नवा राजा!

## एकनाथ शिंदे होणार नवे पक्षप्रमुख

✔ सुराज्य/मुंबई

**केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाबाबत महत्त्वपूर्ण निकाल दिल्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची आज, मंगळवारी महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीला शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत. आज संध्याकाळी ७ वाजता मुंबईतील त ा ज प्रेसिडेंट येथे ही बैठक होणार आहे. शिवसेना पक्षाचे मुख्य नेते, मुख्यमंत्री शिंदे य ा बैठकीला मार्गदर्शन करणार आहेत. राष्ट्रीय कार्यकारणी पदाधिकारी, खासदार, आमदार हेही या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. शिवसेनेच्या नव्या वाटचालीबाबत या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार असल्याचे समजते. याशिवाय आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांच्यासोबत असलेल्या आमदारांना कसे अडचणीत आणता येईल, यावरही यावेळी रणनीती ठरणार असल्याचे समजते.**



मुंबईतील ताज रेसिडन्स येथे शिवसेना कार्यकारिणीची बैठक पार पडेल. यावेळी एकनाथ शिंदे यांची नवे पक्षप्रमुख म्हणून निवड केली जाण्याची शक्यता आहे. तसेच नव्या शिवसेनेचे राष्ट्रीय नेते, उपनेते यांचीही निवड करण्यात येणार आहे. यामुळे आता नेतेपदी कोणाची निवड होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

ठाकरे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देण्याच्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी याचिका ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर मंगळवारी सुनावणी घेण्यास नकार दिला. ही सुनावणी आता बुधवारी दुपारी ३.३० वाजता होईल. प्रथम १६ आमदारांची अपात्रता आणि सत्तासंघर्षाच्या प्रकरणावर सुनावणी होईल, अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने घेतली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह शिंदे गटाला बहाल करताना निकालपत्रात अनेक बाबी नमूद केल्या होत्या. आपण कोणत्या निष्कर्षांच्याआधारे हा निर्णय घेतला, याची कारणमीमांसा आयोगाकडून करण्यात आली होती. मात्र, या निकालात अनेक विसंगती असल्याची चर्चा आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आमदार आणि खासदारांच्या संख्याबळाच्या आधारे शिंदे गटाची बाजू उचलून धरली होती. शिंदे गटाकडे पक्षाचे उपनेते, विभाग प्रमुख, जिल्हाप्रमुख, प्रतिनिधी सभेतील सदस्यांचा बहुमताने पाठिंबा आहे. याशिवाय, ४० आमदार व १३ खासदारांचा पाठिंबा असल्याने त्यांच्याकडे बहुमत असल्याचा निष्कर्ष आयोगाने काढला होता. हा निष्कर्ष काढताना आयोगाने आमदार आणि खासदारांना निवडणुकीत मिळालेली मतं गृहीत धरली होती. परंतु, एखाद्या आमदार किंवा खासदाराला मिळालेली मतं ही सर्वस्वी त्याच्या एकट्याची असू शकत नाहीत, पक्षनेतृत्त्व, पक्षाचे धोरण यांच्याकडे बघूनही अनेक मतदार संबंधित पक्षाच्या उमेदवाराला मतदान करतात. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत हा मुद्दा शिंदे गट आणि निवडणूक आयोगासाठी अडचणीचा ठरू शकतो.



# बँकेच्या नोटिसने शेतकरी हादरले

✔ नागपूर/वृत्तसंस्था

तांत्रिक कारणामुळे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील कर्जमाफिच्या लाभापासून वंचित नागपूर जिल्ह्यातील सहाशेवर शेतकऱ्यांवर थकीत कर्ज दाखवित नागपूर जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह बँकेने जमिनीच्या लिलावाची नोटीस बजावली आहे. सरकारकडून ही कर्जमाफी मिळणार, असे आश्वासन दिले जात असताना बँकेकडून कारवाईची तत्परता दाखविली जात असल्याने शेतकरी हादरले आहेत. माजी मंत्री बच्चू कडू यांनी हे लिलाव न थांबविल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. तर दुसरीकडे हे १५-२० वर्षांपासून थकीत कर्ज असल्याने कायद्यानुसार कारवाई केली जात असल्याचे बँकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याने वाद निर्माण झाला आहे.

### त्यांचे हात-पाय तोडू

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार बच्चू कडू पुन्हा एकदा आक्रमक झालेले पाहायला मिळाले. शेतकऱ्यांच्या जमिनींचा लिलाव करणाऱ्याचे हातपाय तोडू असा इशाराच बच्चू कडू यांनी दिला आहे. ते सध्या नागपुरात आंदोलन करत आहेत. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इथे शेतकऱ्यांच्या जमिनींबाबत बच्चू कडूंनी चर्चा केली. जिल्हा बँकेची लिलाव प्रक्रिया उधळून लावू असा इशारा बच्चू कडूंनी दिला आहे. लिलाव करण्याची पद्धत आम्ही हाणून पाडण्याचा बच्चू कडूंनी थेट धमकीवजा इशाराच बँकांना दिला आहे.

राज्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त विदर्भात मागील पाच वर्षांपासून दुष्काळी स्थिती आहे. शेतकरी आत्महत्यांचा आकडा वाढू लागला आहे. संकटात अडकलेल्या या शेतकऱ्यांना बळ देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७मध्ये काही अटींसह छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर केली. दोन लाख रुपयांपर्यंतच्या या कर्जमाफिसाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना प्रथमच ऑनलाइन अर्ज दाखल करायचे होते. मात्र ऑनलाइन अर्ज पाठविताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी आल्या. तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांचे अर्ज मुख्य यंत्रणेकडे पोहचले नाही. तर त्रुटींमुळे अनेकांचे बाद झाले. १९ ऑक्टोबर २०१९पर्यंत कर्जमाफिचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांच्या २३ ग्रीन याद्या आल्या. २०१९च्या निवडणुकीनंतर राज्यात सत्ताबदल झाले. हा प्रश्न सुटण्यापूर्वीच तत्कालीन ठाकरे सरकारने महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना राज्यात लागू केली. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना मागे पडली. पोर्टलही बंद केले गेले. करोनात तर कर्जमाफी हा विषयच बाजूला पडला आणि लाखो शेतकरी कर्जफिच्या लाभापासून वंचित राहिले.

# फटाक्यांनी आग भडकली, शुभकार्यात हाहा:कार



✔ **टिटवाळा** : कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील महागणपतीचे स्थान असलेल्या टिटवाळ्याजवळच्या सांगोडा गावात एका साखरपुड्याच्या कार्यक्रमानिमित्त फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली होती. मात्र पेटलेल्या फटाक्यांनी तेथे पार्क केलेल्या काही वाहनांना लक्ष केले आणि शुभ कार्याच्या ठिकाणी एकच हाहा:कार उडाला.

पेटलेल्या आगीत तेथे पार्क केलेली वाहने जळून खाक झाली. मात्र या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे वृत्त आहे.

कल्याण तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सांगोडा गावाच्या शिवारात साखरपुड्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वरवधू पक्षाच्या दोन्हीकडील यजमानांची लगबग सुरू होती. सर्वजण आनंद व्यक्त करण्यात व्यस्त होते. हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी त्या ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

उंच उंच उडणाऱ्या फटाक्यांकडे साऱ्यांचे लक्ष वेधले जात होते. मात्र काही क्षणांतच आनंदावर विरजण पडणारी घटना घडली. शुभ सोहळ्यात एकच कोलाहल माजली. फटाक्यांच्या ठिणग्या उडून खाली पडल्यानंतर तेथील गवताला आग लागली.

# सहा गव्यांचे मृतदेह आढळले, मृत्यूचे गूढ कायम



✔ **सांगली** : एकाच वेळी संशयास्पदरित्या पाच गवे रेडे मृत अवस्थेमध्ये सांगलीच्या शिराळा तालुक्यातल्या रिळे या ठिकाणी आढळून आले आहेत. दोन दिवसांपूर्वी त्याच ठिकाणी एका गव्याचा मृत्यू झाला होता, त्यामुळे एकूण सहा गवे रेडे मृत्युमुखी पडले आहेत. वन विभागाकडून या गव्यांचे शविच्छेदन करून दहन करण्यात आले आहे. प्राथमिक तपासामध्ये विषबाधा होऊन गव्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज वनविभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

रिळे गावा नजीक असणाऱ्या पाटील दरा हद्दीत हे गवे संशयास्पदरित्या मृत अवस्थेत आढळून आले आहेत. मृत ५ गव्यापैकी २ गव्यांचे मृतदेह पूर्ण पणे सडलेल्या अवस्थेत सापडले. ज्यामध्ये तीन मादी आणि दोन नर गव्यांचा समावेश आहे. हे सर्व गवे दीड ते सहा वर्ष वयोगटातील आहेत. या घटनेनंतर गव्यांच्या मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले. यानंतर वन विभागाकडून मृत गव्याचे त्याच ठिकाणी दहन करण्यात आले आहे.

काही लोकांनी त्यानंतर शोध घेतला असता, त्यांना झाडांच्या झुडपामध्ये गवा मेलेल्या कुजलेल्या अवस्थेत आढळला. याबाबत तातडीने वनविभागाला कळवण्यात आलं. त्यानंतर वन विभागाने या ठिकाणी पोहोचत इतरत्र आणखी शोध घेतला असता त्यांना एका मागून एक असे पाच गवे मृत अवस्थेत आढळून आले. त्यापैकी तीन गव्यांच्या मृतदेह हा कुजून गेलेले होते.

# संसदेतील शिवसेना कार्यालय शिंदे गटाला बहाल

✔ नवी दिल्ली/वृत्तसंस्था



केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला दिल्याने ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. पक्षनाव आणि पक्षचिन्ह ताब्यात आल्यानंतर शिंदे गट आणखी आक्रमक झाला असून त्यांनी शिवसेनेची कार्यालये ताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे.

काल विधिमंडळातील कार्यालय ताब्यात घेतल्यानंतर आज संसदेतील शिवसेनेचे कार्यालयही आता शिंदे गटाला मिळाले आहे. संसदेच्या उपसचिव सुनंदा चॅटर्जी यांनी खासदार राहुल शेवाळे यांना पत्र लिहित संसदेतील कार्यालय ताब्यात घेण्याचे निर्देश दिले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केल्यानंतर महाराष्ट्रात सत्तासंघर्ष निर्माण झाला. हा सत्तासंघर्ष सर्वोच्च न्यायालयात पोहचला आहे.

गेल्या सात ते आठ महिन्यांपासून महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सुनावणी सुरू आहे. तर, पक्षाबाबतचा निर्णय निवडणूक आयोगाच्या दरबारी होता. निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला धक्का देत शिंदे गटाच्या बाजूने कौल दिला. त्यामुळे शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाकडे गेले. यावरून शिंदे गटात कमालीचा आनंद पसरला असून ठिकठिकाणी जल्लोष सुरू आहे. दरम्यान, संपूर्ण पक्षाचा ताबा शिंदे गटाकडे आल्याने त्यांनी शिवसेनेच्या कार्यालयांवरही ताबा मिळवायला सुरुवात केली आहे.

त्यानुसार, विधिमंडळातील शिवसेना कार्यालयात प्रताप सरनाईक यांनी प्रवेश करत ताबा मिळवला. त्यानंतर, मुंबई महापालिकेतील शिवसेना कार्यालयही ताब्यात मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, हे कार्यालय आधीच सील करण्यात आले आहे. तरीही मुंबई महापालिकेवर काल छावणीचे स्वरुप प्राप्त झाले होते.

महाराष्ट्रातील शिवसेना कार्यालयांबाबत या घडामोडी घडत असताना संसदेतील शिवसेना कार्यालयही शिंदे गटाला मिळाले आहे. संसदेतील शिवसेना कार्यालयात शिंदे आणि ठाकरे गटाकडून वापरण्यात येत होता. वाद सुरू झाल्यानंतरही दोन्ही गटातील सदस्य एकाच कार्यालयात बसत होते. परंतु, आता लोकसभा सचिवालयाने शिवसेना शिंदे गटाला हे कार्यालय दिले आहे.

मुंबई महापालिकेची मुदत संपल्याने आजी नगरसेवक माजी नगरसेवक झाले. मात्र निवडणूक होईपर्यंत पालिका आयुक्त इकबाल चहल यांनी, सर्वच पक्षांच्या माजी नगरसेवकांना व गटनेते आदींना पक्ष कार्यालय वापरता यावे, यासाठी खुले ठेवले होते. येथील शिवसेनेचे पक्ष कार्यालय शिंदे गटाने ताब्यात घेऊ नये यासाठी उद्धव ठाकरे गटाकडून पत्रकार परिषद घेणे सुरू करण्यात आले.

# मला संपवण्याची सुपारी श्रीकांत शिंदेंनी दिली

## संजय राऊत यांचा आरोप

✔ **मुंबई** : ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यावर मोठा आरोप केला आहे. श्रीकांत शिंदे यांनी राजा ठाकूर यांना माझी सुपारी दिली आहे, असा आरोप राऊतांनी केला आहे. याप्रकरणी आता खुद्द राजा ठाकूर यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. माझ्या इज्जतीची वाट लावतायत, मला गुंड बोलण्याचा अधिकार कोणी दिला? असा सवाल उपस्थित करताच संजय राऊतांविरोधात मी तक्रार करणार आहे, असं राजा ठाकूर म्हणाले आहेत. एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

राजा ठाकूर हा ठाण्यातील कुख्यात गुंड असून त्याला जामिनावर सोडवण्यात आलं आहे. जामिनावर सोडवून त्यांना टास्क देण्यात आले आहेत, असे आरोप संजय राऊतांनी केले आहेत. यावरून राजा ठाकूर यांनी संताप व्यक्त केला असून सत्ता गेल्यापासून राऊत प्रसिद्धी मिळवण्यासाठी काहीही बरळतात असा पलटवार राजा ठाकूर यांनी केला आहे. तसंच, माझी बदनामी केल्याप्रकरणी मी पोलिसांत जाणार असल्याचंही ते म्हणाले.

माझी बायको वकील आहे. त्यामुळे आम्ही संजय राऊतांविरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार आहोत. माझ्यावर त्यांनी खोटा आळ आणला आहे.

# नवी मालिका 'प्रेमास रंग यावे' भेटीला

✔ **सोलापूर** : आपण एखाद्यावर प्रेम करतो म्हणजे नेमकं कशावर प्रेम करतो? त्या व्यक्तीच्या रंग-रूपावर, श्रीमंतीवर, कि त्या व्यक्तीच्या चांगुलपणावर, त्याच्या सुंदर मनावर? सन मराठीवरील २० फेब्रुवारीपासून, सोमवार ते शनिवार रात्री ९.३० वाजता प्रेक्षकांच्या भेटीस आली असलेली प्रेमास रंग यावे ही मालिका नेमकी ह्याच प्रश्नाभोवती फिरते. ही गोष्ट आहे एका अत्यंत हुशार, सालस, सहृदयी अक्षराची आणि एका चांगल्या मनाच्या पण खुशालचेंडू, न्यूनगंडाने भरलेल्या आणि पारंपरिक अर्थाने देखणा नसलेल्या सुंदरची.

# बालकवींची कविता 'फुलराणी' चित्रपटात

✔ **सोलापूर** : हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे, त्या सुंदर मखमालीवरती फुलराणीही खेळत होती. बालकवींची ही प्रसिद्ध कविता समस्त मराठी जनांच्या हृदयात कायमची कोरली गेली आहे. रसिकांच्या कितीतरी पिढ्या या फुलराणीने फुलवल्या. आगामी फुलराणी या मराठी चित्रपटातून ही अजरामर कविता गीतरूपाने आपल्या भेटीला येणार आहे. दिग्दर्शक विश्वास जोशी यांनी ही फुलराणी आपल्यासमोर आणली असून या फुलराणीचा अनोखा अंदाज २२ मार्चला आपल्याला चित्रपटगृहात अनुभवायला मिळणार आहे.

## ▶▶ जगाच्या नकाशावर भारत विश्वगुरूची उदघोषणा

# विज्ञान, धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या ९व्या जागतिक परिषदेची मान्यता

✔ सुराज्य/पुणे



भारताचे द्रष्टे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वैश्विक संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या नॉलेज कॉरिडॉरमधून भारत विश्वगुरू' या संकल्पनेची उद्घोषणा ९ व्या विज्ञान, धर्म/अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाच्या जागतिक परिषदेचे संकल्पक व संयोजक, थोर शिक्षणतज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे ९ ते ११ फेब्रुवारी या दरम्यान ही परिषद नवनिर्मित श्री काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर करण्यात आली होती.

४५ वर्षे अथकपणे विश्वशांती, मानवता आणि सांप्रदायिक सद्भावनेचे कार्य करणारे, तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली-जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज ते तत्त्वज्ञ शास्त्रज्ञ डॉ. अल्बर्ट आईनस्टाईन म्हणजेच अध्यात्म ते विज्ञान या प्रवासाला एक नवीन अर्थ देणारे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना या ९व्या जागतिक परिषदेमध्ये काशी विद्वत परिषदेच्या वतीने विश्वशांती विद्यारत्न, बनारस हिंदू विद्यापीठाच्या भारत अध्ययन केंद्रातर्फे विश्वशांती उद्गाता, बनारस हिंदू विद्यापीठाच्या युनेस्को अध्यासनातर्फे समर्पित जीवन गौरव पुरस्कार' आणि संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठातर्फे संस्कृत श्री असे अत्यंत प्रतिष्ठेचे सन्मान मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

९व्या जागतिक परिषदेचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री व बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे माजी कुलपती डॉ. करणसिंग यांनी केले होते. यावेळी इंद्रेश कुमार, प्रमोद कुमार, योगी अमरनाथ, अविनाश धर्माधिकारी, भूषण पटवर्धन, डॉ.ए.एस. किरण कुमार यांची सन्माननीय उपस्थिती होती. याप्रसंगी जगप्रसिद्ध संगणक तज्ञ डॉ. विजय भटकर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा सहभागी झाले होते.

जागतिक परिषदेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, १० फेब्रुवारी रोजी पार पडलेला सर्व धर्मीय शुभाशिर्वाद सोहळा आहे. यामध्ये जगातील सर्व धर्मग्रंथ हे खऱ्या अर्थाने जीवनग्रंथ आहेत, या तत्त्वावर आधारित जगातील विविध धर्मांचे पवित्र भगवद्गीता, पवित्र कुराण, पवित्र बायबल, पवित्र त्रिपिटक, पवित्र गुरु ग्रंथसाहेब, पवित्र तोराह यांचे त्या त्या धर्मातील मानवकल्याणाविषयीचे मुलभूत तत्त्वज्ञान थोडक्यात उपस्थितांसमोर मांडण्यात आले. प्रत्येक धर्माची उपासनापद्धती वेगळी असली, तरी सर्व धर्मांमध्ये प्रेम, करुणा, दया, त्याग, समर्पण याचीच शिकवण दिली जाते.

सदरील ९ व्या जागतिक परिषदेमध्ये विविध विषयांवरील एकूण १० सत्रांचे आयोजन करण्यात आले होते, त्यामध्ये चाणक्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश धर्माधिकारी, नॅकचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, इटलीचे माजी राजदूत डॉ. बसंत गुप्ता, बिहारचे माजी पर्यटन मंत्री प्रमोद कुमार, सुप्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ. दिपक रानडे, ज्येष्ठ तज्ञ हरी राम त्रिपाठी, थोर विचारवंत डॉ. रामविलास वेदांती, आचार्य लोकेश मुनी, फिरोज बख्त अहमद, फेलिक्स मच्याडो, डॉ. एडिसन सामराज, डॉ. ॲलेक्स हॅन्की, आनंदी रविनाथन् अशा अनेकांनी विद्वत्तापूर्ण विचार मांडले. या ऐतिहासिक परिषदेची सांगता काशी बनारस जाहीरनाम्याच्याद्वारे करण्यात आली. सदरील ऐतिहासिक जाहीरनाम्या द्वारे, सर्वसंमतीने भारत विश्वगुरू असा उद्घोष करण्यात आली. तसेच उपस्थितांनी स्वामी विवेकानंदांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने कार्यरत राहण्याची कटिबध्दता जाहीर केली. आयोजित पत्रकार परिषदेत एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, डॉ. संजय उपाध्ये, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, पर्यावरण तज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र कुलगुरू डॉ.मिलिंद पांडे आणि प्रा.मिलिंद पात्रे उपस्थित होते.

# प्रकाश पाटलांचा सल्ला; प्रणिती शिंदेंनी जिल्हाभर काम करावे

## पक्षातील काही बडी मंडळी गडबड करतात : आ.शिंदे

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसची अवस्था अत्यंत नाजूक आहे. ती सुधारण्यासाठी काँग्रेसच्या सर्वच आजी माजी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे महत्वाचे आहेत. आमदार प्रणिती शिंदे यांनी स्वतःचा मतदार संघ किंवा सोलापूर शहरापुरते सिमीत न राहता, परिसिमेच्या बाहेर यावून काम करण्याची गरज आहे. तसे केले तरच जिल्ह्यात काँग्रेस जिवंत राहणार आहे, असा सल्ला पंढरपूर काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष प्रकाश पाटील यांना आमदार प्रणिती शिंदे यांना दिला.**

आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते इतिहासकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले, त्या कार्यक्रमात पाटील बोलत होते. दरम्यान, पक्षातील काही बडी मंडळी गडबड करत असल्याने सर्वसामान्य कार्यकर्ता पक्षापासून विचलित होत आहे, असा गंभीर आरोप करत, आमदार प्रणिती शिंदे यांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांनाच घरचा आहेर दिला आहे.

प्रकाश पाटील म्हणाले की, सध्याच्या राजकीय स्थितीमध्ये सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसची अवस्था अत्यंत नाजूक आहे. ती सुधारण्यासाठी आतापासून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याची गरज आहे. जी काही काँग्रेस आहे, ती माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यामुळे जिवंत आहे. आमदार प्रणिती शिंदे यांनी स्वतः मतदार संघा पुरते सीमीत न राहता, त्यांनी सोलापूर शहराची परिसिमी ओलांडून संपूर्ण जिल्ह्यात लक्ष देण्याची गरज आहे; अन्यथा यापेक्षा वाईट वेळ येऊ शकते असा सल्लाही पाटील यांनी दिला. यावेळी आमदार शिंदे म्हणाल्या




की, जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहे, तोपर्यंत इंदिरा गांधींची काँग्रेस जिवंत राहणार आहे. कोणीही काँग्रेसला संपवण्याचा प्रयत्न केला, तरी तो संपणार नाही. आजही जुन्या काळातील ज्येष्ठ आणि निष्ठावंताच्या बळावर काँग्रेस पक्ष टिकून आहे. अलीकडच्या राजकीय घडामोडींमध्ये पक्षातील काही नेते गडबड करत आहे. त्याचा परिणाम पक्षातील कार्यकर्त्यांवर होत आहे. अनेक ठिकाणचे कार्यकर्ते विचलित झाले आहेत. पक्ष वाढवण्याची आणि तळागाळा पर्यंत पोचविण्याची जबाबदार सर्वांवर आली आहे. या वेळी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार, सुनंजय पवार, आदित्य फत्तेपूरकर, राहुल पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकसभा लढवण्याचा अद्याप विचार केला नाही : आ.शिंदे

सोलापूर लोकसभेसाठी आ. प्रणिती शिंदे यांच्या नावाची चर्चा होत आहे. मात्र या कार्यक्रमात त्यांनी लोकसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात अजून मी पूर्णपणे विचार केला नाही. त्यासाठी अजून वेळ असल्याचेही स्पष्ट केले. त्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये अजून संभ्रम निर्माण झाला आहे.

## राजू शेट्टी आक्रमक : 'स्वाभिमानी'चे आज चक्का जाम आंदोलन

सुराज्य/सोलापूर



स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात बुधवार, २२ रोजी राज्यभर चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. बारावीच्या परिक्षामुळे ते आंदोलन दुपारी १२ वाजता करण्यात येईल. पोलिसांनी आंदोलन करू दिलं नाही, तर जशाच तसं उत्तर दिलं जाईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख, माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिला. राजू शेट्टी सोलापुरात आले होते, त्यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शेतकऱ्यांचे विजेचे बिल दुरुस्त करून द्यावे, विज वितरण कार्यालयाने शेतकऱ्यांची वीज तोडणी थांबवावी यासह वेगवेगळ्या प्रश्नांवर हे आंदोलन होणार आहे. वीज दरामध्ये करण्यात येणारी ३७ टक्के दरवाढ आम्हाला मान्य नाही. फक्त पाच जिल्ह्यांमध्ये दिवसा वीज दिली आहे, ती संपूर्ण महाराष्ट्रात द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. सोलापूरसह सातारा, कराड, खटाव, फलटण या प्रमुख ठिकाणी चक्का जाम करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा यासह अनेक ठिकाणी चक्काजाम आंदोलन होणार आहे, असेही ते म्हणाले.

## खरी शिवसेना कोणाची निकाल लागला

# आता मंत्रिमंडळ विस्ताराच्या आमदारांना आशा

सुराज्य/सोलापूर



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारच्या बहुप्रतीक्षित दुसऱ्या मंत्रिमंडळ विस्ताराला कधी मुहूर्त लागणार याची उत्सुकता लागली आहे. आता एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्ष आणि चिन्ह दोन्ही आले आहे, त्यामुळे लवकरच हा विस्तार होईल, अशी आशा इच्छुकांना लागली आहे. सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या आमदारांनी तर मंत्रिपदासाठी अनेक महिन्यांपासून वरिष्ठांकडे लॉबींग लावली आहे.

येत्या २४ फेब्रुवारीपासून विधिमंडळाचे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशना दरम्यान आता मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावेळी २३ जण मंत्रिपदाची शपथ घेण्याची चिन्ह आहेत. यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्र्यांचा समावेश असेल. भाजप आणि शिवसेना या पक्षामध्ये ५०-५० टक्के असा फॉर्म्युला निश्चित झाल्याचे बोलले जात आहे. म्हणजेच एका पक्षाचे ११, तर दुसऱ्याचे १२ जण मंत्रिपदाची शपथ घेऊ शकतात.

भाजपकडे १२ मंत्रिपदे येऊ शकतात. सोलापूर जिल्ह्यात भाजपाचे आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. राम सातपुते, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील आणि समर्थक राजेंद्र राऊत (अपक्ष) असे ७ आमदार आहेत, दोन खासदारही आहेत. याशिवाय एक आमदार आणि एक माजी आमदारही भाजपाच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून एक मंत्रिपद जिल्ह्याला मिळण्याची शक्यता आहे. आगामी काळात सोलापूर महापालिका, जिल्हा परिषद निवडणुका होणार आहेत. गतवेळी महापालिका बहुमताने भाजपाने प्रथमच ताब्यात घेतली आहे. आता ती पुन्हा टिकवायची आहे आणि प्रथम जिल्हा परिषदही एकहाती ताब्यात घेण्याचे भाजपाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे सोलापूरला मंत्रिपद शहरी भागात जाणार की ग्रामीण भागात याची उत्सुकता लागली आहे.

### मंत्रिपद शहराला की ग्रामीणकडे?

सध्या आ. समाधान आवातडे, राम सातपुते हे पहिल्यांदा निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे उर्वरित पाच आमदारांमध्ये मंत्रिपदासाठी रस्सीखेच असणार आहे. शहराचा विचार केला तर आ. विजय देशमुख किंवा सुभाष देशमुख आणि ग्रामीणचा विचार केल्यास सचिन कल्याणशेट्टी, राजा राऊत किंवा रणजितसिंह यांच्यापैकी एकाला मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे.

### आता आमदार बंड करण्याची शक्यता कमी

आतापर्यंत 'खरी शिवसेना' कोणाची हा निर्णय निवडणूक आयोगाने दिला नव्हता. मात्र आता हा निकाल शिंदेंच्या बाजूने लागला आहे. त्यामुळे आता मंत्रिमंडळ विस्तार होईल असे बोलले जात आहे. जरी शिंदे गटातील काही आमदार आता नाराज झाले तरी शिवसेना पक्ष शिंदेंकडेच आल्याने आता त्यांची समजूत काढणे सोपे जाणार आहे आणि आमदार बंड करण्याची शक्यता कमी राहणार आहे.

## पुतणीचा खून करणाऱ्या चुलत्याला पळून जाताना पकडले

सुराज्य/मोहोळ

चार वर्षीय पुतणीला ठार मारुन पळून सिना नदीपात्रात गेलेल्या चुलत्याला मोहोळ शहरातील नरखेड रस्त्यावर गाडीवरून जात असताना पोलिसांनी पकडले.

मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथे आईच्या नावावर असलेली सहा एकर जमीन स्वतः च्या नावावर करून दे, असे म्हणून यशोदीप धावणे हा गेल्या दोन ते तीन वर्षापासून भाऊ यशोधन शिवाजी धावणे व कुटुंबाला त्रास देत होता. तसे न केल्यास तुमचा वंशजच शिल्लक ठेवत नाही, अशी धमकी देत होता. यातूनच त्याने२० रोजी चार वर्षीय पुतणी ज्ञानदा हिला गाडीवर घेऊन जाऊन तिला जीवे ठार मारून मलिकपेठ येथील सीना नदीच्या पात्रामध्ये पाण्यामध्ये फेकून दिले होते घटनेनंतर तो फरार झाला होता.. याप्रकरणी तिचे वडील यशोधन धावणे यांनी भावाविरुद्ध मोहोळ पोलिसात तक्रार दिली होती.



मोहोळ पोलिसांनी चुलता यशोदीप धावणे यांच्या शोधासाठी पथके रवाना केली होती. त्याच्या मोबाईल नंबर च्या लोकेशन नुसार त्याचा पाठलाग अक्कलकोट पासून पोलीस पथक करत होते. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता नरखेड रस्त्यावरून गाडीवरून जात असताना मोहोळ पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. ही कामगिरी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र राठोड पोलीस हवालदार सचिन माने, पोलीस नाईक प्रवीण साठे, पोलीस कॉन्स्टेबल सिद्धनाथ मोरे, होमगार्ड पांडुरंग काळे यांच्या पथकाने केली. २२ रोजी त्याला मोहोळ येथील न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## विवाहितेचा छळ; पतीसह सासू,नणंदवर गुन्हा

सोलापूर : तुझ्या वडिलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही.तसेच विवाहितेला ट्रॅव्हल एजन्सी करिता दहा लाख रुपये घेऊन ये असे बोलत शारीरिक व मानसिक त्रास देऊन शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह सासू व नणंदविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना लग्नानंतर दोन महिने ते ६ फेब्रुवारी २०२२ पर्यंत सासरी घडली.

याप्रकरणी सादिया सोहेल मुल्ला (वय-२६, रा.लोकमान्य नगर मस्जिद समोर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पती सोहेल रशीद मुल्ला, सासू शमा रशीद मुल्ला (रा. लोकमान्य नगर, मजरेवाडी) नणंद सना इरफान नदाफ (रा. कोल्हापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार बहिर्जे हे करीत आहेत.

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत आज माढा शहरात

### नागरी सत्कार व हुरडा पार्टीचे आयोजन

सुराज्य/माढा



गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हे बुधवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून माढा शहरात त्यांच्या नागरी सत्काराचे आयोजन केल्याचे त्यांचे मित्र डॉ. अभयकुमार लुणावत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

बुधवार दिनांक २२ रोजी सकाळी ९ वाजता सोलापूर येथील विमानतळावर त्यांचे आगमन होणार आहे. सोलापूरहून माढ्याला येत असताना सकाळी १०.३० वा अनगर येथे माजी आमदार राजन पाटील यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेणार आहेत. यानंतर माढा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी १२:१५ वा त्यांचा नागरी सत्कार संपन्न होणार आहे. या सत्कार सोहळयास आ.बबनराव शिंदे, आ.धनाजीराव साठे, आ.संजयमामा शिंदे, नगराध्यक्षा मिनलताई साठे, शिवसेना जिल्हा समन्वयक शिवाजी सावंत, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, मुख्याधिकारी चरण कोल्हे, राजेंद्र चवरे, झुंजार नाना भांगे, आनंदराव कानडे व इतर मान्यवर उपस्थित उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर डॉ.अभयकुमार लुणावत यांच्या निमगाव (मा) येथील फार्म हाऊसवरती हुरडा पार्टी स्नेहभोजन होणार आहे. यानंतर ते पंढरपूरला रवाना होतील. सायंकाळी सोलापूर येथील सम्राट चौकातील संजीवनी हॉस्पिटलच्या भूमिपूजनाला उपस्थिती राहणार असल्याचे ही डॉ. अभयकुमार लुणावत यांनी सांगितले.या पत्रकार परिषदेस प्रमोद वेदपाठक, दिपक जगताप, संतोष लुणावत, बापू पाटील उपस्थित होते.

## तरुणाच्या हातातील मोबाईल पळवला

सोलापूर : जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील साई डेव्हलपर अँड कस्ट्रक्शनच्या सार्वजनिक रस्त्यावर लावलेल्या चार चाकी वाहनाजवळ दोन अनोळखी इसमानी मोटरसायकलीवर येऊन तरुणाच्या हातात असलेला १ लाख १९ हजार ९०० रुपये किमतीचा आयफोन कंपनीचा मोबाईल हिसका मारून चोरून नेला आहे. ही घटना जुना एम्प्लॉयमेंट चौक सोलापूर येथे घेतली. याप्रकरणी अमोल प्रकाश गायकवाड (वय-२९, रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ६, चव्हाण वस्ती) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्तपास पोसई माळी हे करीत आहेत.

### लॉन्ड्री समोरून मोटरसायकल लंपास

सोलापूर : गुरुवंदन अपार्टमेंट जवळील गणेश लॉन्ड्री समोर पार्क करून ठेवलेली मोटरसायकल चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना दि.१९ ते २० फेब्रुवारी दरम्यान गुरुवंदन अपार्टमेंट येथील गणेश लॉन्ड्री जवळ घडली.याप्रकरणी चैताली प्रशांत क्षिरसागर (वय-३०,रा. दमानी नगर,सह्याद्री अपार्टमेंट) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

## 'मालमत्ता कराचे उत्पन्न न वाढवल्यास १५ व्या वित्त आयोगातील अनुदान बंद होण्याची शक्यता'

सुराज्य/सोलापूर



यापूर्वीच निर्णय झाल्याने मिळकतकर वाढीचा निर्णय मागे घेता येणार नाही. ठरल्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होईल असे स्पष्ट करतानाच मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे अन्यथा १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मिळणारे अनुदान बंद होण्याची होऊ शकते असे आदेश नगर विकास विभागाच्या वतीने महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

सोमवारी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी अंदाजपत्रकासंदर्भात माहिती देताना पाच टक्के मिळकत कर वाढीच्या अंमलबजावणीची माहिती दिली होती. दरम्यान ही करवाढ मागे घेण्याची मागणी होत असल्याचे आयुक्तांना विचारले असता त्यांनी हे स्पष्टीकरण दिले.

**करवाढ मागे घेण्याचा निर्णय घेता येणार नाही**

मिळकत करात पाच टक्के करवाढीचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. त्यास यापूर्वी मान्यता ही दिली आहे. केवळ या आर्थिक वर्षापासून ही करवाढ वसुलीची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे यात फेरबदल अथवा मागे घेण्याचा निर्णय घेता येऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून मिळकतकर वसुलीचे उद्दिष्ट वाढविणे व ते वेळेत पूर्ण करणे तसे न झाल्यास पंधराव्या वित्त आयोगाचा निधी महापालिकेला मिळू शकणार नसल्याचे आदेश महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. यामुळे आता मिळकतकर उद्दिष्टपूर्तीकडे लक्ष देण्यात येणार आहे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.




### वसुलीवर प्राधान्याने लक्ष देणार: आयुक्त

महापालिकेच्या चालू मिळकत कराच्या उद्दिष्ट उद्दिष्टाच्या १५२ कोटी पैकी आज रोजी ६० टक्के वसुली झाली आहे जुनी कर थकबाकी असलेल्या ४८३ कोटी पैकी ११ टक्के वसुली करण्यात आले आहे असे जुनी व चालू मिळून एकूण ६३६ कोटी मधून ३६ टक्के वसुली झाल्याचे दिसून येते. हा आकडा मोठा वाटतो यामुळे वसुलीवर प्राधान्याने लक्ष देण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

# नऊ हजार वह्या व रोपे भेट देऊन शिवतेजसिंहांचा वाढदिवस साजरा

सुराज्य/अकलूज

माळशिरस तालुक्यासह जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांकडून नऊ हजार वही व तीन हजार रोपे भेट देत अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. हार फुले या खर्चाला फाटा देत असंख्य कार्यकर्त्यांनी शालेय साहित्य आणून तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून शिवबाबांचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला.

शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळ पासूनच त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी वर्दळ पाहायला मिळाली. सकाळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या समाधीचे व श्रीक्षेत्र आनंदी गणेश येथील कै.उदयसिंह मोहिते पाटील यांच्या शक्तिस्थलाचे दर्शन घेऊन आईसाहेब डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांचे त्यांनी आशीर्वाद घेतले. यावेळी पत्नी सौ.देवन्या यांनी त्यांचे औक्षण केले. वाढदिवसानिमित्त माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ.रणजितसिंह मोहिते पाटील, धैर्यशील मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, कीर्तीध्वजसिंह मोहिते पाटील यांच्यासह माळशिरस तालुका व सोलापूर जिल्ह्यातील विविध संस्थेचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच शासकीय अधिकारी यांनी शिवतेजसिंह यांना प्रत्यक्ष भेटून, दूरध्वनीवरून तसेच सोशल मिडिया च्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. अनावश्यक खर्चाला फाटा देऊन हार फुले न आणता शालेय साहित्य आणावे असे आवाहन शिवकीर्ती युवा मंच च्या माध्यमातून केल्यानंतर या आवाहनाला उदंड प्रतिसाद लाभला अनेक जणांनी वह्या, पेन, रोपे अशा वस्तू आणत आपल्या नेत्याचा वाढदिवस साजरा केला.



### क्रेनने आणला हार

महाळुंग येथील नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत, विपीन सूर्यवंशी, बबलू भगत व श्रीपुर येथील सागर यादव, बजरंग भोसले यांनी आणलेल्या सुमारे दोन हजार किलो वजनाचा पुष्पहार आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. हालगीच्या तालावर व फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला.

## देवदर्शनासाठी गेलेल्या व्यापाऱ्याचे घर फोडले

सुराज्य/सोलापूर

व्यापारी आपल्या कुटुंबासह कारवार येथे देवदर्शनासाठी गेले असताना चोरट्याने संधीचा फायदा घेत दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत रोख रकमेसह रक्कमसह अडीच लाखांचे दागिने लंपास केले.

ही घटना दि.२० ते २१ फेब्रुवारी दरम्यान वीर तपोरत्न पाटील नगर आकाशवाणी केंद्र पाठीमागे घडली. याप्रकरणी अनिल सोमनाथ पातोळे (वय-४६,रा.वीर तपोरत्न पाटील नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्याने ८० हजार रुपयांची रोख रकमेसह सोन्याचांदीचे दागिने मिळून एकूण २ लाख ५३ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. तपास हे पोलीस निरीक्षक पेटकर हे करीत आहेत.

## पाणीपुरवठा आणि व्यापारी संकुलासाठी आरोग्यमंत्र्यांची मुख्यमंत्री शिंदेंसोबत चर्चा

सुराज्य/माढा






माढा शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी पाईपलाईन तसेच शहरात व्यापारी संकुल उभारणीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा या मागणी प्रश्नी आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी पुढाकार घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांनी प्रत्यक्ष भेट घेतली असून लवकरच निधी उपलब्ध होणार असून या बाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांनी दिली.

माढा शहराला पाणीपुरवठा करणारी येवती -माढा ही पाईपलाइन जिर्ण झाल्याने शहराला सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने या योजनेचा केंद्र शासनाच्या अमृत २.० या योजनेत समावेश करून घ्यावा. तसेच माढा नगरपंचायतीच्या उपलब्ध मिळकतींवर व्यापारी संकुल उभारणीसाठी १२ कोटी २० लाख रुपये निधी देण्यात यावा या दोन मागण्यांचे निवेदन माढा नगर पंचायतीच्या विरोधी गटातील नगरसेवकाबरोबरच माढा तालुका शिवसेनाप्रमुख मुन्ना साठे, शहर प्रमुख भैय्या खरात यांच्यावतीने वाकाव येथे आरोग्यमंत्री डॉ.तानाजीराव सावंत यांना देण्यात आले होते.

### मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दाखवली : प्रा.शिंदे



मागणीची तत्परतेने दखल घेत आरोग्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन या दोन्ही मागण्यांची मान्यता घेऊन यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली आहे.याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शविल्याने माढा शहराच्या पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईन व व्यापारी संकुलाचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याचा विश्वास प्रा.शिवाजीराव सावंत यांनी बोलताना व्यक्त केला.